CMYK




गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० | अंक : ४५ | सोमवार दि. ३१ ऑक्टोंबर २०२२ ते रविवार दि. ०१ नोव्हेंबर २०२२ | पाने : ६ | किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

॥ जय माता जी ॥



॥ माता बारोंडादेवी प्रसन्न ॥

## शाळकरी मुले अखेर भाईगिरीच्या आहारी गेली एकाला दारु पाजून त्याची दुसऱ्याने हत्या केली

**बेळगाव/क्राईम रिपोर्टर**

सध्या तरुणाईची पावले गुन्हेगारीच्या मार्गावर पडत आहेत. कारण मुलांना आई–वडिलांचा धाक राहिलेला नाही. तसेच आई–वडील कामानिमित्ताने बाहेर असल्याने मुलांकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ मिळत नाही. त्यातच प्रत्येक मुलांकडे आजकाल मोबाईल दिसायला लागले आहेत. आणि मोबाईल मध्ये असलेल्या इंटरनेट मध्ये माहितीचे मायाजाल ठासून भरलेले असल्याने मुलांना त्यातली माहिती अगदी सहजपणे मिळते. अशावेळी इंटरनेट मधील चांगली आणि शिक्षणाच्या दृष्टीने महत्वाची असलेली माहिती शोधण्याऐवजी, मुले विद्यार्थीदशेत चुकीची माहिती शोधतात. ज्यात पोनोग्रफी, वेगवेगळ्या प्रकारचे व्हिडीओगेम, तसेच गुन्हेगारीची माहिती मिळवतात आणि त्यातूनच त्यांची पावले गुन्हेगारीच्या मार्गावर पडतात. लहान वयात मुलांना दारू, सिगारेट, आमली पदार्थ, सेक्स यांचे व्यसन लागते. तसेच एक्शन सिनेमात हिरोने केलेली भाईगिरी आजकालच्या तरुणांना आवडू लगली आहे. आणि त्यामुळे विद्यार्थी दशेतच मुले बिघडतात आणि हि बिघडलेली मुले आई–वाडिलानाही ऐकत नाहीत. तसेच शाळेतील शिक्षकानाही ऐकत नाहीत. विध्यार्थी टवाळखोर बनतात. त्यातून शाळा कॉलेजपासूनच त्यांची भाईगिरी सुरु होते. बेळगावच्या शिवाजी नगरात राहणाऱ्या अशाच दोन शाळकरी मुलांमध्ये दुष्मनी झाली आणि याच दुष्मनीतून प्रज्वल कारेगार नावाच्या विध्यार्थ्याची हत्या करण्यात आली. या प्रकरणी आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.







शाळा कॉलेजमधील दोस्ती कधी दुश्मनीत बदलील सांगता येत नाही.ये दोस्ती नही तोंडेंगे म्हणत गळ्यात गळा घालून फिरणारे मित्र कधी एकमेकाशी भांडण करून एकमेकांचे वैरी होतात.खरे तर शिक्षण घेत असताना करियर महत्वाचे असते परंतु वाईट संगतीला लागून अनेक मुले बिघडत असतात.दारू पिणे, सिगारेट ओढणे,मुलीची छेड काढून रॅगिग करणे यातून नको ते प्रकार घडतात. त्यामुळे दोस्त असणारे मित्र ही एकमेकांचे वैरी बनुन खुन्नस नजरेने पाहून दुश्मनच बनतात.खून मारामारी हे त्याच्या अंगवळणीच बनून नशे की बात खिसे म्हणत ही तरूणाई मारामारी करताना चल तुला कुठे जायचे ते चल म्हणत तुलाच बघून घेतो असे बेदरकारपणे वागून खूनासरख्या घडनेत अडकते.बेळगाव येथील शिवाजी नगर पाचवा क्रॉस येथे राहणारा प्रज्वल करेगार हा सोळा ... पान २ वर

## आंतरजातीय प्रेमविवाहाची शोकांतिका झाली मुलाच्या ताब्यासाठी पतीने पत्नीची हत्या केली

**मुंबई/एस. कुमार**

**मुंबई–सगळेच आंतरजातीय प्रेमविवाह यशस्वी ठरतात असे नाही त्यासाठी पती–पत्नी आणि सासरच्या लोकांनीही एकमेकांना सांभाळून घ्यायचे असते. पण शेवटी रीतीरीवाजावरून संसारात खटके उडतात अशावेळी पती–पत्नी मधील वाद लवकर मिटवला नाही. तर अशा वादातून एखाद्याचा जीवही जाऊ शकतो चेंबूरमध्ये असेच घडले. एका हिंदू मुलीने मुस्लीम तरुणाशी प्रेमविवाह केला पण तिने मुस्लीम पद्धतीनेच रहायला हवे असा सासरच्यांचा आग्रह होता. पण तिला ते मान्य नव्हते त्यामुळे ती आपल्या मुलाला घेऊन वेगळी झाली पण पती मुलाचा ताबा मागू लागला तर त्याच्याकडे घटस्फोट मागू लागली त्यावरून दोघांमधील वाद इतका वाढला कि पतीने पत्नीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे.**



वरिष्ठ पो. निरीक्षक सुनिल काळे



पो. निरीक्षक विलास राठोड



मयत–जारा

दिनांक २६ सप्टेंबर रोजी घटस्थापने स्थापनेच्या दिवशी रात्री ९.३० वाजताचे दरम्यान करुणा रॉयल ही महिला तिची आई वंदना व बहीण चैताली या तिघीही त्यांच्या ओळखीची व्यक्ती इरशाद अब्दुल समद शेख यांचे घरी नागेवाडी येथे गेल्या होत्या. घरात इरशाद, त्याची आई व त्याची बहीणी हे सर्व एकत्र बसले होते. करुणा, तिची आई व बहीण चैताली यासुध्दा तेथे जाऊन बसल्या. त्यांच्यात इकडच्या तिकडच्या गप्पा सुरु असताना रात्री १०.३० वाजता गल्लीतील दोन मुले कलीम व अज्जू हे धावतच तेथे आले आणि त्यांनी करुणा व तिच्या आईस सांगितले की, बबली की मम्मी आपकी बेटी जारा को उसके आदमी ने चाकु मारके गिरा दिया आपल्या बहिणीवर तिच्या पतीने चाकूने हल्ला केल्याची माहिती मिळताच करुणा तिची आई, बहीण चैताली तसेच इरशाद, इरशादची आई सईदा असे सर्व जण प्रगती चाळ, राहूल नगर, चेंबुर या ठिकाणी रवाना झाले. काही वेळातच हे सर्व कुटुंबातील नातेवाईक त्या ठिकाणी पोहचले. त्यावेळी करुणा हिची बहीण रुपाली रमेश चंदनशिवे उर्फ जारा (वय २०) ही रूम नं. ३ व १४१ समोर गल्लीमध्ये प्रगती चाळ, राहूल नगर, चेंबुर, मुंबई या ठिकाणी जमिनीवर रक्तबंबाळ अवस्थेत पडलेली होती. तिच्या गळ्यावर व हातावर जखमा होवून रक्त येत होते. तिच्या बाजूला रक्ताने माखलेला सुरा, तिचा मोबाईल व चपला पडलेल्या होत्या. अशी माहिती करुणा हिने पोलिसांना दिली. ... पान २ वर

## अनैतिक संबंधात हॉटेलवाल्याचा झाला तोटा आईच्या प्रियकराचा मुलांनीच काढला काटा

**वर्धा/क्राईम रिपार्टर**

**ज्या मुलांना कष्ट करून वाढवले ती मुले वाईट मार्गाला लागली कि पोटापाण्यासाठी आई–वडिलांना सुधा चुकीचा मार्ग धरावा लागतो. वर्ध्यात राहणाऱ्या एका महिलेच्या बाबतीत असेच झाले दोन मुले असूनही ती काही कामाची नसल्याने तिला हॉटेल मध्ये काम करावे लागत असे त्यातूनच तिचे हॉटेल मालकाशी सूत जुळले. मात्र याची माहिती तिच्या मुलांना समजताच ते संतप्त झाले त्यातील एकजण गांजाच्या तस्करी प्रकरणी तुरुंगात जावून आला होता. आईच्या अनैतिक संबंधही माहिती मिळताच दोन्ही भवानी आपल्या एका मित्राच्या मदतीन होटेल वाल्याच्या घरी जावून त्याची हत्या केली आणि फरारी झाले पण २० दिवसांनी पोलिसांनी त्यांना अटक केली.**

वर्धा शहरापासून आठ कि.मी. अंतरावर सेवाग्राम नावाचे छोटेसे गाव आहे. सेवाग्राम येथे महात्मा गांधींजींचा आश्रम आहे. साबरमती आश्रमानंतर गांधीजींनी स्थापना केलेला हा दुसरा आश्रम असल्यामुळे भारतभर सेवाग्रामची वेगळी ओळख करून द्यावीच लागत नाही. अशा या सेवाग्राममधील भैसारे, ले आऊट, कामठवाडा याठिकाणी शेंडे परिवार रहातो. या परिवारात अजय आणि रोशन अशी भावडे राहतात. अजय हा ३० वर्षाचा आणि रोशन हा २८ वर्षाचा आहे. अजय आणि रोशन कळती सवरती मुले आहेत. या मुलांपैकी मोठा मुलगा अजय हा गुन्हेगारी वृत्तीचा आहे. गांजाच्या तस्करीमध्ये त्याला मध्यप्रदेशच्या पोलिसांनी अटक केली होती. त्या गुन्ह्याखाली तो छत्तीसगढ येथील जगदलपूर येथील जेलमध्ये दोन वर्षे शिक्षा भोगत होता. काही महिन्यापूर्वीच त्याची जामिनावर सुटका झाली होती. तो जेलमध्ये गेला तेंव्हा त्याची आई अरुणकुमार थूल यांच्या घरी काम करत होती. ... पान २ वर



## खोट्या सहानुभूतीला अनामिका फसली परप्रांतीयाकडून आपली अब्रू गमावून बसली

**जळगाव/ललित खरे**

**संसारात एखाद्या महिलेला पतीकडून त्रास होऊ लागला कि तिला सहानुभूती दाखवण्यासाठी ओळखीचे लोक पुढे येतात आणि तिला मदतीचे आश्वासन देऊन तिचा उपभोग घेतात. जळगाव येथील अनामिकाच्या बाबतीतही असेच घडले. पती बरोबर वाद होतात हि बाब तिने तिच्या कामातील एका परप्रांतीय तरुणाला सांगितली आणि याच गोष्टीचा गैरफायदा घेत त्याने तिला खोटी सहनुभूती दाखवीत तिच्याशी जबरदस्तीने अनैतिक संबंध जुळवले इतकेच नव्हे तर दोघांच्या शरीर संबंधाची व्हिडियो क्लिप बनवून तिला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. अखेर या प्रकरणी तिने पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवताच पोलिसांनी आरोपीला अटक केली.**




पुर्वीच्या काळी विवाहीत महिलांकडे केवळ चुल आणि मुल एवढीच जबाबदारी होती. घरातील सर्व कामकाज सांभाळून मुलांचे संगोपन व्यवस्थित करावे एवढीच तिच्याकडून अपेक्षा ठेवली जात असे. जुन्या काळात ती अपेक्षा एकप्रकारे वाजवी स्वरुपाची होती. त्यामुळे विवाहीतेचे संपुर्ण लक्ष आपल्या संसारावर केंद्रीत रहात होते. पुरुष मंडळींना आपली नोकरी अथवा आपल्या व्यवसायावर पुर्ण क्षमतेने लक्ष देणे शक्य होत असे. मात्र आता जमाना बदलला आहे. महागाईचा भस्मासुर आजच्या ... पान ५ वर

## गुप्तधनाची आस दाखवून खिसा रिकामी केला फसवणूक झालेल्यांच्या हातून भोंदू बाबा मेला

**तासगाव/क्राईम रिपोर्टर**

**आजकाल माणूस पैशाच्या मागे धावत असतो. पैशासाठी त्याची काहीही करायची तयारी असते. आणि अशीच माणसे भोंदू बाबांची शिकार बनतात. तासगाव तालुक्यातील धमनी येथे अशाच एका भोंदू बाबाने गुप्तधनाची आस दाखवून एका ओळखीच्या माणसाला आणि त्याच्या मित्रांना लुबाडले होते. पण चार महिने उलटले तरी गुप्तधन मिळाले नाही त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी भोंदू बाबाला निर्जन स्थळी नेऊन त्याचा काटा काढला. या प्रकरणातील सर्व आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.**

पुरोगामी महाराष्ट्रात आजही अंधश्रध्देच्या नावाखाली अनेक घटना घडत आहेत.कुणी गुप्तधन शोध्रून देतो म्हणून सांगतो तर कुणी करणी बाधा काढून देतो म्हणून सांगून फसवणुक करीत असतात.याला सर्व सामन्य माणुस नव्हे तर सुशिक्षीत लोक ही बळी पडत असतात.हे कशाचे धोतक आहे याचा सारसार विचार केला तर आज काल प्रत्येकजण पैशाच्या मागे लागलेला दिसून येतो तो पैसा कसाही मिळो तो मिळालाच पाहिजे त्यासाठी बरेचजण अंधश्रध्देच्या नादाला लागून गप्त धन मिळवून देणाऱ्याच्या पाठीमागे लागत असतात.तो भामटा ही त्याना गुप्तधन मिळवून देतो म्हणून सांगून त्याची हातोहात फसवणूक करत



असतो ज्यावेळी त्याना गुप्तधन मिळत नाही त्यावेळी ते लोक त्या भामटया कडे आपण दिलेले पैसे परत मागत असतात.त्यातून त्याचेत वादावादी होत असते.तो काही त्याना पैसे परत देत नाही अशावेळी ते लोक त्याचा ... पान ५ वर

## अनैतिक संबंधाचा गावभर बोभाटा झाला पत्नीच्या प्रियकराचा पतीनं गेम केला

**अबंड/क्राईम रिपोर्टर**

**अनैतिक संबंधाची एकदा का चटक लागली आणि दोघानाही एकमेकांपासून मनसोक्त सुख मिळायला लागले कि मग अशा रिलेशनशिपमध्ये असलेल्या स्त्री–पुरुषांना कुणाचीच भीती वाटत नाही. कारण त्यांना फक्त सुख हवे असते अंबड मध्ये अशाच एका घटनेत राजेंद्र भोर आणि अलका यांचे अनैतिक संबंध जुळलेल्या दोघेंही विवाहित होते. असे असतानाही त्यांचे अनैतिक संबंध सुरु होते मात्र याची माहिती अलकाच्या पाटील समजताच तो भयंकर चिडला सुरुवातीला त्याने पत्नीला मारझोड सुरु केली आणि त्यानंतर त्याने राजेंद्र भोर याचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**



संपुर्ण देशात सोमवार दि.२४ ऑक्टोंबर रोजी उत्साहात दिवाळीचा सण साजरा होत होता. ... पान २ वर

## सैनिकाच्या पत्नीचे दुसऱ्याशी जुळून आले प्रियकराच्या मदतीने पतीला ठार केले

**चंडीगड/क्राईम रिपोर्टर**

**देशवासीयांच्या संरक्षणासाठी दिवस रात्र डोळ्यात तेल घालून देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानाच्या बाबतीत प्रत्येकाच्या मनात आदर असतो पण कधी–कधी अशा शूर योध्याच्या जीवनात काही पापी माणसे येतात आणि त्याचे आयुष्य उध्वस्त करतात किशनपुरा येथील एका लष्करी जवानाच्या जीवनात पत्नी म्हणून आलेल्या एका चंचल महिलेने केवळ शरीर सुखासाठी दुसऱ्याशी संबंध जुळवले आणि आपले हे अनैतिक संबंध टिकवण्यासाठी तिने प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी त्या महिलेला आणि तिच्या प्रियकराला अटक केली आहे.**

विवाहित स्त्री ही विवाहबाय संबंधात अडकली की,तिला नवऱ्याची कदरच नसते.ती आपल्या याराबरोबर गुलर्छ्रे उडवित मजा मारत असते.त्यातच नवरा जर बाहेर गावी नोकरीस असला तर तिला या कामासाठी रानच मोकळे होते.कधी तरी नवरा सुट्टी घेऊन घरी आला की त्याला खुश करण्याऐवजी ती आपल्या यारालाच खुश करून नवऱ्याला तुझा काहीच उपयोग नाही हे



दाखवून देवून नवऱ्याला कसलीच किमंत देत नाही विवाहबाहय संबंध हे खरोखर असतातच असे त्यात संबंधात एकदा का अडकले की त्याची चटकच लागून जाते.त्या संबंधाला तिच्या नवऱ्याने तिच्या घराच्या लोकांनी तिला विरोध केला की ती मग आपल्या त्या संबंधात अडसर ठरणाऱ्या नवऱ्याचा काटा काढायला ही मागे पुढे ... पान ५ वर

CMYK

31 TO 01 OCTOBER 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 10/29/2022 9:43 PM Page 1



पान १ वरून....

## शाळकरी मुले अखेर भाईगिरीच्या आहारी....

वर्षाचा तरूण १९ ऑक्टोबर सायंकाळी ५ वाजलेपासून आपल्या शाळेपासून बेपत्ता होता.त्याचा मृतदेह २० ऑक्टोंबर रोजी मुंचडी येथील शेतवडीत मिळून आला.त्याच्या डोक्यात मोठा दगड घालून त्याच्या पाठीवर तलवारीने वार केल्याच्या खुणा दिसत होत्या.त्याचा खून कुणी आणि कोणत्या ?कारणासाठी केला याची कॅम्प पोलीसातून मिळालेली माहिती अशी...! बेळगाव शहरातील शिवाजीनगर पाचवा क्रॉस येथे प्रज्वल शिवानंत करेगार हा आपल्या आई वडिलासह राहयला आहे.त्याच्या घरची परिस्थीती ही तशी बेताची असली तरी त्याच्या आई वडिलांनी त्याच्या शिक्षणासाठी कोणतीही कसर सोडली नाही.तो कॉलेज रोड वरील जीए हायस्कुल मध्ये इयत्ता १० वीत शिकत होता. तो अभ्यासात हुशार असला तरी शाळेतील टवाळखोर मित्राच्या नादाला लागून तो ही बिघडत चालला होता.लक्ष्मण होसमणी हा त्याचा मित्र होता.तो ही त्याच शाळेत शिकत होता.सुरूवातीला ते दोघे चांगले मित्र असले तरी नंतर मात्र त्या दोघात किरकोळ कारणावरून वैर निर्माण झाले.त्यातून एकमेकाकडे खुन्नस नजरने पाहणे एकमेकांना बघून घेण्याची भाषा केली जात होती.गेल्या एक दीड वर्षापूर्वी प्रज्वलला लक्ष्मण याने मारहाण केली होती.त्यामुळे प्रज्वल ही त्याचेवर चिडून होता.ते दोघे ही समोरा समोर आले की एकमेकाकडे बघून तुला आता सोडत नाही अशी भाषा ते वापरत होते.त्यातच शाळेतील एका मुलीवर त्या दोघांचा जीव ही जडला होता.त्यामुळे त्यातून त्याची दुश्मनी अधिकच गडद होत चालली होती.ती मुलगी मात्र दोघांना ही भाव देत नव्हती. तिच्या लेखी प्रेम वैगरे काही नव्हते. पण दोघे ही तिला आपली लैला मानत होते.भांडणात तु माझ्या आयटमकडे का बघतोस म्हणून वाद घालीत होते.त्याचे अभ्यासात लक्ष कमी पण बाहेरच्या लफडयात जास्त लक्ष होते.बऱ्याचवेळेला त्याची ही भांडणे शाळेत आणि शाळेच्या बाहेर होत असल्याने संपुर्ण शाळेला त्याची भांडणे माहित होते.त्यातून शाळेच्या प्रशसनाने त्याच्या पालकांना शाळेत बोलावून घेऊन याबाबतची माहिती त्याच्या पालकांना सांगून त्याच्या त्याच्या पाल्याकडे लक्ष दया म्हणून सांगितले होते.त्यावेळी पालकांनी शाळेच्या प्रशासनाला देखील मुलावर लक्ष ठेवण्यास सांगून आपल्यावरील जबाबदारी त्याचेवर ढकलली होती आणि येथेच त्याची ही चुक झाली. लक्ष्मण आणि प्रज्वल हे दोघे ही तसे भांडखोर आणि ताटर होते.या वयातच त्यांना दारू पिण्याचे व्यसन लागलेले होते.शाळा चुकवून ते दोघे ही आपआपल्या मित्रासोबत दारू प्यायला बाहेर जात होते.दारूची नशा झाली की मग काय विचारण्याची सोय नव्हती.वयाच्या १६ व्या वर्षी ते दारू आणि इतर व्यसनाच्या आहरी गेल्याने त्याच्या पालकांनी ही हात टेकले होते.ते तरी त्याचेवर किती लक्ष ठेवणार होते हा ही प्रश्नच होता.प्रज्वलच्या वडिलांनी ही त्याला बऱ्याच वेळेला समजावून सांगून वाईट मित्राच्या संगतीला लागू नकोस म्हणून सांगितले होते.पण तो काही त्याचे ऐकत नव्हता.शाळेला जातो असे सांगून बाहेरच दारू पिणे मित्राच्याबरोबर भांडण काढणे असा उदयोग करीत होता.त्याचे आणि लक्ष्मण होसमणी याचे भांडण आहे हे सपूंर्ण शाळेला माहित होते.दोघेही एकमेकांकडे भुवया उडवून आणि शर्टाची कॉलर उडवून पाहत होते.मागील काही महिन्यापूर्वी त्याचेतील भांडण विकोपाला गेले होते.शाळेत आल्यावर लक्ष्मणने प्रज्वलकडे पाहत आपली कॉलर उडवून डोळयाच्या भुवया ही उडवल्या होत्या याचा राग प्रज्वलला आला.त्याने ही तशाच पध्दतीने कॉलर उडवून त्याचेकडे पाहत डोळच्या भुवया उडवून त्याला त्याच पध्दतीने उत्तर दिले.त्याच दिवशी शाळा सुटल्यावर प्रज्वलने प्रज्वलने लक्ष्मण आणि त्याच्या मित्रांना गाठून दादागिरी केली.याचा राग ही लक्ष्मण आणि त्याच्या दोघा अल्पवयीन मित्रांना आला होता.त्यांनी प्रज्वलचा काटा काढयाचा ठरविले. गेल्या काही महिन्यापासून लक्ष्मण हा शाळेत येत नसल्याने व त्याची वर्तनुक चांगली नसल्याने शाळेने त्याला बाहेरचा रस्ता दाखविला होता.त्यामुळे तो शाळेत येत जरी नसला तरी त्याला शाळा किती वाजता सुटते हे चांगले माहित होते.बुधवार दि.१९ ऑक्टोंबर रोजी तो आणि त्याच्या दोघा अल्पवयीन मित्रांनी दारू प्याली होती.शाळा सुटायच्यावेळी तो आणि त्याचे मित्र एका दुचाकीवरून शाळेच्या गेटजवल संध्याकाळी ५ वाजणेच्या सुमारास येवून थांबले.त्यावेळी शाळा सुटल्यावर प्रज्वल हा दप्तर पाटीला अडकवून शाळेच्या गेटमधून बाहेर येत असताना लक्ष्मण आणि त्याच्या दोन मित्रांनी त्याला अडविले.त्याचेकडे खुन्नसी नजरेने पाहत त्याला बोलविले.तू सारखा का आमच्याबरोबर भांडण काढत असतोस ?असे विचारून आम्ही तुला सोडणार नाही अशी धमकी दिली.प्रज्वल हा धाडशी आणि निडर असल्याने तो त्याच्या धमकीला न घाबरता त्यांना म्हणाला.येथे शाळा आहे येथे राडा नको तु म्हणशील तेथे चल.मी काय तुला घाबरतो काय?कोण कोणाला बघून घेतो ते बघू असे म्हणत स्वत:च त्याच्या दुचाकीवर बसून सीबीटीकडे चल तेथे तुला ही दाखवितो असे म्हणाला.त्यानंतर लक्ष्मण याने त्याला सीबीटीकडे न नेता आपली दुचाकी हिडोल्को कणबुर्गी मार्गे सरळ मुचंडी येथे घातली.तेथे एका शेतात त्या चौघांनी परत दारू प्यायली.आता आयताच प्रज्वल हा त्याचेबरोबर दारू प्यायला बसल्याने त्या तिघांचे ही फावले होते. दारू पित असताना त्या तिघांनी त्याला शिव्या दयायला सुरूवात केली.दारूची नशा तशी चौघांना ही झाली होती.प्रज्वल ही त्यांना शिव्या देत त्यांच्या अंगावर जात होता.दारू पिता पिता तो लक्ष्मणच्या अंगावर बाटलीने मारायला गेला.त्यावेळी लक्ष्मण आणि त्याचे दोन्ही मित्र त्याच्या अंगावर जात त्याला लाथाबुक्कांनी मारहाण करायला सुरूवात केली.त्याच्यामध्ये बाचाबाची सुरू असताना,लक्ष्मणच्या एका मित्राने प्रज्वलला घट्ट पकडून ठेवले. लक्ष्मण आणि त्याचा दुसरा मित्र त्याला मारहाण करीत होते. त्याच वेळी खाली पडलेल्या प्रज्वलच्या डोक्यात लक्ष्मण याच्या दुसऱ्या मित्रांने जवळच पडलेला मोठा दगड घातला. त्यासरशी त्याचे डोके फुटून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. त्याची तडफड चालू होती. तो ओरडत होता.रात्रीचे ७.३० ते ८ वाजत आले होते.शेतवाडी जवळून जाणाऱ्या रस्त्यावर कुणी नव्हते. त्यामुळे त्याच्या ओरडण्याचा फारसा परिणाम झाला नाही.नेमक्या याच संधीचा फायदा घेत लक्ष्मणच्या मित्राने आपल्या जवळील तलवारीने त्याच्या पाठीवर सपासपा वार केले. त्यासरशी प्रज्वल हा रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडला.त्याचा आपल्या हातून खून झाला आहे हे लक्षात येताच लक्ष्मण आणि त्याच्या मित्रांनी दुचाकीवरून पळ काढला. इकडे रात्र होत आली तरी प्रज्वल हा घरी परत आला नाही म्हणून त्याचे वडिल शिवानंद यांनी त्याच्या मित्राकडे चौकशी करायला सुरूवात केली.त्यावेळी त्याच्या मित्रांनी त्यांना सांगितले की शाळा सुटायच्यावेळी प्रज्वल याच्याशी त्याच्या दोन मित्रांनी भांडण काढून त्याला आपल्या गाडीवरून बसवून कुठे तरी नेले आहे.ही माहिती मिळताच शिवांनत करेगार यांनी कॅम्प पोलीस स्टेशन गाठून आपला मुलगा प्रज्वल करेगार (वय१६) याचे कुणी तरी अपहरण केले असल्याची तक्रार दाखल केली. त्यांनी तक्रार दाखल केल्यानंतर पोलीस बेपत्ता प्रज्वलचा शोध घेत होते. त्याच दरम्यान दि.२० ऑक्टोबर रोजी मरिहाळ पोलीसांना मुंचडी गावाजवळील एका शेतवडीत एका अल्पवयीन तरूणाचा मृतदेह पडला असल्याची माहिती मिळाली.ही माहिती समजाताच पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची पाहणी करून मृतदेहाची ओळख पटवली.मयत हा बेळगाव शहरातील प्रज्वल करेगार हा असल्याची माहिती मिळाल्याने पोलीसांनी या घटनेची माहिती त्याच्या घरच्या लोकांना दिली.घटनास्थळी दारूच्या बाटल्या, चकणा,आणि चप्पल पडल्या होत्या.पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी बेळगाव येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला.मयत तरूण हा बेपत्ता असल्याची तक्रार कॅम्प पोलीसात दाखल असल्याने मरिहाळ पोलीसांनी हा गुन्हा कॅम्प पोलीस ठाण्याकडे वर्ग केला. कॅम्प पोलीस या घटनेचा तपास करीत असताना प्रज्वल हा लक्ष्मण होसमणी याच्या गाडीवर बसून गेला आहे याची माहिती मिळाली.पोलीस त्याचा शोध घेत असताना खणगाव बीके येथून ताब्यात घेतले.त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना त्याने आपले व प्रज्वल याचे वैर होते तो आपल्याला व आपल्याा अल्पवयीन मित्रांना दादागिरी करीत होता.त्यातून आमचे भांडण झाल्याने आम्ही तिघांनी मिळून त्याला मारून टाकले असल्याची माहिती दिली.त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी त्याच्या दोघा अल्पवयीन मित्रांना ही ताब्यात घेतले.त्यांनी ही आपला गुन्हा कबुल केला.शिवानंत करेगार याच्या तक्रारीवरून प्रज्वल शिवानंद करेगार(वय१६) याच्या खून प्रकरणी लक्ष्मण होसमणी (वय१९) आणि त्याच्या दोघा अल्पवयीन मित्राच्यावर आयपीसी कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना कोर्टासमोर उभे केले असता मा. कोर्टाने लक्ष्मण होसमणी याची हिंडलगा जेलमध्ये रवानगी केली.तर दोघा अल्पवयीन मुलांची बालसुधारग्रहात रवानगी केली.या दरम्यान पोलीसांनी लक्ष्मण होसमणी याच्याकडून गुन्हयात वापरलेला दगड,दुचाकी, व तलवार जप्त केले.या घटनेचा तपास कॅम्प पोलीस यांनी करून या घटनेतील संशयीतांना ताब्यात घेऊन गुन्हयाची उकल केली.या घटनेवरून आजची तरूण मुले ही भांडणात खटक्यावर बोट जागेवर पलटी या प्रमाणे वागत आहेत हेच दिसून येते.

## आंतरजातीय प्रेमविवाहाची शोकांतिका झाली...

टिळकनगर पोलिसांनी करुणा आगस्टीन रॉयल या तरुणीची लेखी फिर्याद घेतली तशी डायरीत नोंद केली. त्यानंतर फिर्यादी तरूणी करुणासह तिच्या काही नातेवाईकांना सोबत घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील काळे, पोलीस निरीक्षक विलास राठोड, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजदत्त कांबळे आणि इतर कर्मचारी घेऊन तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. हे घटनास्थळ म्हणजे चेंबूर येथील राहुलनगर रूम नं. ३ व १४१ समोर गल्लीमध्ये प्रगती चाळ हे होते. घटनास्थळची दाखल होताच पोलिसांना रुपाली रमेश चंदनशिवे उर्फ जारा ही महिला रक्ताच्या थारोळ्यात पडलेली दिसली. पोलिसांनी वेळ न घालविता जखमी महिलेला पोलीस व्हॅन मध्ये घातले आणि ती व्हॅन घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयाकडे रवाना झाली. रुपालीला घेवून जात असताना गाडीतच ती बेशुध्द पडली. काही वेळातच पोलीस व्हॅन राजावाडी रुग्णालयात पोहचली. तिचे नातेवाईक व पोलीस कर्मचारी यांनी रुपाली चंदनशिवे या महिलेला उपचाराकरीता रुग्णालयात दाखल केले. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. डॉक्टरांनी या महिलेची तपासणी केली असता ती मृत झाल्याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी दोन पंचा समक्ष प्रेताचा पंचनामा करून रुपाली चंदनशिवे या महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रवाना केला. लगेच या घटनेची माहिती पूर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त संजय दराडे, परिमंडळ ६ चे पोलीस उपायुक्त कृष्णकांत उपाध्याय व देवनार विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन जाधव यांना देण्यात आली. ते तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळची प्रत्यक्ष पाहणी करून टिळकनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील काळे, पोलीस निरीक्षक विलास राठोड, सपोनि दळवी, कांबळे व पोलीस पथकाने पंचनामा करून तो मृतदेह घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात पोस्टमोर्टमसाठी रवाना केला आणि या गुन्ह्याचा तपास सुरू झाला. एका मुस्लिम तरुणाने एका हिंदू तरुणीचा खून केल्याने हे प्रकरण लव्ह जिहाद असल्याचे माध्यमांच्या प्रतिनिधीने उचलून धरले होते. त्यामुळे काहीसे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. कायदा आणि सुव्यवस्था बिघडू नये म्हणून पोलिसांनी सर्वतोपरी खबरदारी घेतली होती. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी अगदी बारकाईने तपास करून या सर्व प्रकरणाची पाळेमुळे खोदून काढली. तेव्हा हा प्रकार लव्ह जिहाद नसल्याचे स्पष्ट झाले. तसे पोलिसांनी माध्यमांना वेळच्यावेळी कळविले. काहींनी मुद्दाम दोन समाजात तेढ निर्माण होईल असा प्रकारच्या बातम्या देऊन वातावरण दुषित करण्याचा प्रयत्न केला परंतु ते शक्य झाले नाही. पोलिसांनी मृतक महिलेचं कुटूंब व संशयित आरोपींचे कुटूंबाची चौकशी केली असता, त्यातून हा गुन्हा फक्त प्रेम प्रकरणातून झाल्याचे दिसून आले. प्रेम हे आंधळं असतं. ते जात, धर्म बघत नाही. ते कधी कोणावर बसेल हे ही सांगता येत नाही. असंच रुपाली उर्फ जारा आणि इकबाल मोहम्मद शेख या दोघांच्या बाबतीत घडले. रुपाली रमेश चंदनशिवे या २० वर्षीय मराठी तरुणीचे इकबाल मोहम्मद शेख या ३६ वर्षीय मुस्लिम तरुणावर प्रेम बसले होते. दोघेही एकमेकांवर प्रेम करीत असल्याने या दोघांनी तीन वर्षापूर्वी प्रेम विवाह केला होता. लग्नानंतर रुपाली हिचे नाव बदलून जारा ठेवण्यात आले. या दोघांचा सुखाचा संसार चालू झाला. दोघेही गुण्यागोविंदाने राहू लागले. तो टॅक्सी चालवून आपल्या कुटूंबा चा उदरनिर्वाह करू लागला. याच दरम्यान त्यांच्या सुखी संसाराच्या वेलीवर एक पुष्प उमलले. त्याचे अली असे ठेवण्यात आले. तो आता दोन वर्षाचा आहे. इकबाल शेखचे पहिले लग्न झाले होते. हे त्याचे दुसरे लग्न होते. जारा ही मराठमोळी मुलगी असल्याने ती आपल्या रितीरिवाजा प्रमाणे वागत होती. परंतु तिच्या सासूसासरे व पती इक्बाल याला तिचे वागणे खटकत होते. रुपाली उर्फ जारा हिने मुस्लीम धर्माप्रमाणे पेहराव करावा, मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे वागावे, घरामध्ये हिंदीत बोलावे असा प्रकारचा दबाब इक्बालचे कुटुंब तिच्यावर टाकत होते. त्यामुळे रुपाली व इक्बाल मध्ये खटके उडू लागले. त्याकारणावरुन इक्बाल व जारामध्ये नेहमी भांडण होत असत. गेल्या सहा महिन्यापासन जारा ही मुलगा अलीसोबत इक्बालपासुन वेगळी राहावयास होती. जारा व इक्बाल हे फोनवर देखिल एकमेकांशी नेहमी भाडत असत. तेव्हा इक्बालचे आईवडिल त्याला जारापासून सोडचिठ्ठी घेण्यास सांगत होते. जारा ही इक्बालपासून वेगळी राहावयास होती. ती सुरुवातीस दादर येथे होस्टेलमध्ये राहावयास होती. गेल्या दोन महिन्यापासून ती तिची मैत्रिण काजल चौधरी व जानवी शर्मा याचे सोबत रूम नं. ३. चाळ नं. सी. मोतीलाल रहिवाशी सघ अमिरबाग नं. २. शिवसेना शाखेच्या जवळ, पी.एल लोखंडे मार्ग चेंबुर याठिकाणी भाडेतत्वावर राहावयास होती. गेल्या सहा महिन्यांपासून ती वेगळी राहत होती. या काळात ती मुलाला पाळणाघरात ठेवून कामाला जात असे. सहा महिने झाले तू वेगळी राहते. मुलाला तू पाळणाघरात ठेवते? या बाबत इक्बालने तिला जाब विचारला. तेव्हा इक्बाल जाराला म्हणाला तू मुलाचा ताबा माझ्याकडे दे.ती म्हणाली मी मुलगा देणार नाही. तू पहिले मला सोडचिठ्ठी दे. यावरून त्या दोघात बराच वेळ पर्यत वादावादी झाली, जारा आता आपले काही ऐकणार नाही. त्यापेक्षा तिला कायमचे संपवलेच बरे असा विचार पक्का करून तो निघून गेला. दिनांक २६ सप्टेंबर रोजी पुन्हा इक्बाल शेख हा रुपाली उर्फ जारा राहत असलेल्या ठिकाणी आला. तेव्हा रात्रीची १०.४५ चा सुमार असावा. दोघांची भेट झाली. या भेटीत पुन्हा त्या दोघात वादावादी झाली. इक्बाल तिच्याकडे मुलगा मागू लागला तर जारा त्याच्याकडे सोडचिठ्ठी मागू लागली. दोघेही हट्टी असल्याने कोणीच माघार घ्यायला तयार होईनात. दोघेही इरेस पेटले होते. आणि इक्बाल चा शब्दांगणिक पारा चढत होता. जारा काही केल्या ऐकायला तयार नाही हे लक्षात आल्यावर त्याने जवळील सुरा काढला आणि तिच्या गळयावर व हातावर सुऱ्याने सपासप वार केले .या हल्ल्याने ती भांबावून गेली. वेदनेने ती किंचाळून लागली.परंतु तिची आर्त किंकाळी ऐकणारे कोणीच नव्हते. ती मला मारू नका. मी तुमच्या पाया पडते. मला जीवदान द्या. मला मारू नका असे म्हणून ओरडू लागली पण रागाने बेभान झालेल्या इक्बालला तिची दया आली नाही. त्याने जारावर आडवे तिडवे वार करण्यात सुरुवात केली. झालेल्या प्राणघातक हल्यास तिला प्रतिकार करता आला नाही. ती जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात कोसळली. आपली जीवनसाथी रुपाली उर्फ जारा हिला मरणाच्या दारात सोडून इक्बालने तिथून पळ काढला. काही वेळातच ती मरण पावली. दरम्यान रुपालीचा खून केल्यावर इक्बाल सरळ टिळकनगर पोलीस ठाण्यात हजर झाला. त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. मृतक रुपाली उर्फ जारा शेख हिची बहीण करुणा आगस्टीन रॉयल हिने दिलेल्या फिर्यादी वरून संशयित आरोपी इक्बाल मोहम्मद शेख याच्या विरोधात टिळकनगर पोलीस ठाण्यात गु.र .क्र.७७७/२०२२ भा.द.वि .कलम ३०२ सह ३७ (१) (अ), १३५ मपोका सह कलम ३ (२), अनुसुचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक कायदा) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यास २७ सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली आहे. पूर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त संजय दराडे, परिमंडळ ६ चे पोलीस उपायुक्त कृष्णकांत उपाध्याय व देवनार विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली टिळकनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील काळे, पोलीस निरीक्षक विलास राठोड, सपोनि. राजदत्त कांबळे, दळवी, पो उप निरी. विजयसिंग देशमुख, पो.हवा.संतोष बनकर, सुनील पाटील, पो. कॉं. संदीप कंक, विशाल भालेराव, समीर पिंजारी इत्यादीनी महत्वाची भूमिका बजावली. सद्या या गुन्ह्याचा तपास देवनार विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन जाधव हे करीत आहेत.

## अनैतिक संबंधात हॉटेलवाल्याचा झाला....

अरुणकुमार हे हॉटेल व्यवसायी आहेत. गोव्यामध्ये त्यांचे हॉटेल असून ते मुळचे वरूड गावचे आहेत. या करंजी (भोगे) येथे त्यांचे घर असून अधून-मधून ते आपल्या घरी राहण्यासाठी येतात. ६२ वर्षाच्या अरुणकुमार यांच्या घरी अजयची आई काम करत होती. तिचे मुले मोठी झाली होती, पण त्या मुलांचा घराला काही हातभार नव्हता. घरचा खर्च भागवण्यासाठी तिलाच लोकांच्या घरी काम करावे लागत होते. तिनेही पन्नाशी ओलांडली होती, पण दुसऱ्याच्या घरी काम करावे लागत असल्याने ती नीटनेटकी रहात असे. त्यामुळे ती आकर्षण दिसायची. ती अरुणकुमार यांच्या घरी काम करायची. त्यांना काय हवे नको ते पहायची. त्यांची काळजी घ्यायची, त्यामुळे दोघात जवळीक निर्माण झाली होती. आपुलकी वाढली होती.

सहवासाने प्रेम वाढते म्हणतात तसेच काहीसे झाले. अरुणकुमार याचे तिच्याशी सूत जुळले. दोन मोठ्या मुलाची आई असूनही तिने अनैतिक संबंधास संमती दिली. दोघात हे संबंध चुपके चुपके सुरु असले तरी याबद्दल कुजबुज सुरु होती.

तिचा मोठा मुलगा जेलमधून परत आला. तेव्हा त्याला आपल्या आईच्या प्रेम संबंधाबाबत कळले. सुरुवातीला त्याने आई सोबत वाद घातला. पण मुळातच आपल्या आईसोबत संबंध ठेवणाऱ्याचा काटा काढायला हवा असे त्याला वाटू लागले. त्याला त्याच्या लहान भावाचीही संमती होती. आपल्या परिस्थितीचा फायदा घेत आपल्या आईला नादी लावणाऱ्या त्या इसमाचा या भावंडांना भयंकर राग येत होता. अखेर या मुलांनी मुळावर घाव घालण्याचे ठरवले.

बुधवार दि. ६ जुलै २०२२ ची रात्र होती. ज्याच्याच्यासमवेत अजय – रोशन यांच्या आईचे संबंध होते, तो अरुणकुमार दुमडुनी थुल हा जवळच असलेल्या करंजी (भोगे) येथे रहात होता. तो घरी एकटाच असतो ही बाब अजय – रोशन यांना माहिती होती. म्हणून त्यांनी आपल्या आणखी एका साथीदाराला घेवून त्याचे घर गाठले. काहीतरी सबब सांगून त्यांनी त्यांच्या घरात प्रवेश केला. ते तिघे आणि अरुणकुमार हा एकटाच घरी होता. घरात आलेल्या तिघांना पाहून अरुणकुमारला आपल्या मृत्यूची चाहुल लागली. त्याने त्याच्यापासून सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला, पण त्याची काही सुटका झाली नाही. अजय, रोशन आणि त्यांच्या साथीदाराने त्याला पकडत त्याच्या अंगातील शर्ट उतरवला. त्याचे तोंड बांधून त्याच्या डोक्यावर लाकडी दांड्याने आणि दारूच्या काचेच्या बाटलीने वार केले. अरुणकुमार रक्ताच्या थारोळ्यात पडल्यानंतर तेथून तिघे जण पसार झाले.

साधारण साडेनऊ-दहा वाजता खुनाची माहिती कळताच गावच्या पोलीस पाटीलांना कळवण्यात आली. त्यानंतर त्यांनी अरुणकुमार थूल यांचा भाऊ सिद्धार्थ दमडुनी थूल यांना रात्री १०.३० वाजता फोन केला, पोलीस पाटीलांनी त्यांना अरुणकुमारचा खून झाल्याची माहिती दिली. आपल्या भावाचा खून झाल्याचे कळताच सिद्धार्थ थूल हे भावाच्या घरी गेले, तेव्हा त्याच्या बेडरूमचा लाकडी दरवाजा तुटून खाली पडलेला दिसला. किचनचा दरवाजाही उघडा होता. अरुणकुमारचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर पडला होता. त्याच्या डोक्यावर गंभीर जखमा होत्या. बाजूलाच दारूच्या बाटलीचे तुकडे, एक लाकडी दांड्याचा तुटलेला तुकडा दिसून आला. अरुणकुमारचा खून झाल्याचे समजताच सिद्धार्थ धूल यांनी या घटनेची फिर्याद सेवाग्राम पोलीस ठाण्यात दिली.

अरुणकुमार धूल याची पार्श्वभूमी पोलिसांनी जाणून घेत त्यादृष्टीने तपास केला असता अनैतिक संबंधाच्या कारणातून हा खून झाल्याचे समजून आले, त्यानुसार पोलिसांनी अधिक तपास करून तीन तरुणांना अटक करण्यात यश मिळवले. ही घटना दि. ६ जुलै रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास उघडकीस आली होती, तेंव्हापासून आरोपी फरार होते. मात्र तब्बल २० दिवसांनी सेवाग्राम पोलिसांनी अरुणकुमारच्या मारेकऱ्यांना अटक केली असून दोन भावंडासह एकास बेड्या ठोकल्या. पोलिसांनी अटक केलेल्यात अजय सुनिल रोडे (वय ३०), रोशन सुनिल शेंडे (वय २८, रा. भैसारे तेआऊट, कामठवाडा सेवाग्राम) आणि गौरव गोविंद कापटे (वय २५, रा. वरूड) यांचा समावेश असून त्यांना सेवाग्राम येथून अटक करण्यात आली. पोलीस कोठडीत त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी गुन्हा कबुल केला. आपल्या आईचे अरुणकुमारसोबत अनैतिक संबंध असल्याने दोन्ही भावांनी एका मित्रासह अरुणकुमारला ठार मारल्याची कबुली दिली.

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक प्रशांत होळकर, अप्पर पोलीस अधीक्षक यशवंत सोळंके, उपविभागीय पोलीस अधिकारी पियूष जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निलेश ब्राम्हने, पोलीस स्टेशन सेवाग्राम यांच्या निर्देशाप्रमाणे उपनिरीक्षक राहुल ईटेकर, हेडकॉन्स्टेबल हरिदास काकड, पोलीस नाईक गजानन कठाणे, कॉन्स्टेबल पवन झाडे, अभय इंगळे, नेमणूक पोलीस स्टेशन सेवाग्राम यांनी केली, तसेच सदर गुन्हा उघडकीस आणण्यास सायबर पथकाने सहकार्य केले.

## अनैतिक संबंधाचा गावभर बोभाटा....

त्याचवेळी सोमवार पहाटेच्या सुमारास अबंड शहरातील बोरी येथील राजेंद्र भोरे याचा चाकूने समासप वार करून खून करण्यात आला.राजेंद्र भोरे हे नेहमीप्रमाणे पहाटेच्या सुमारास होळकर नगर भागात फिरायला बाहेर पडले. त्याचवेळी त्याच्या समोरून येणाऱ्या एका तरूणाने त्याचेवर चाकूने वार करून त्याचा खून करून तो पळून गेला.त्याचे पोटावर छातीवर बरगडयावर त्याने वार केले होते.त्यामुळे राजेंद्र भोरे हे रक्ताच्या थारोळ्यात पडले.त्याचा जागीच मृत्यू झाला.या घटनेची माहिती अबंड पोलीसाना समजाताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची पाहणी करून तपासात त्याचा खून अनैतिक संबधातून झाल्याची माहिती पोलीसांना मिळाली. या घटनेची पोलीस सुत्राकडून मिळालेली माहिती अशी...!

राजेंद्र विठ्ठल भोरे हे अंबड शहरातील होळकर नगर भागात आपल्या पत्नी मुलासह राहयला आहेत.ते एका औषधाच्या दुकानात कामाला असून सकाळ संध्याकाळ ते कामावरून घरी येत जात असताना पाराजी दिवटे याच्या घरावरून येत जात होते.त्यातून त्याची ओळख ही पाराजीची पत्नी अलका (काल्पनिक नांव) हिच्याबरोबर झाली.ती मनमोकळ्या स्वभावाची आणि बोलकी असल्याने राजेंद्र याच्याशी ती हसत खेळत बोलत होती.तो ही तिला काय वहिनी काय बरे हाय काय? म्हणत कायम तिची विचारपुस करीत होता.त्यातूनच त्या दोघांची जवळीक वाढली. अलका ही दिसायला देखणी आणि सुंदर असल्याने तिच्या रुपावर तो मोहित झाला.त्याला ती मनातून आवडू लागली.तो विवाहित असून दोन मुलांचा बाप आहे हे तिला माहित होते.तरी ही ती त्याच्याशी संबंध ठेवायला तयार आहे हे त्याने ओळखले होते.तिच्याशी जवळीक साधत तो ही तिच्याबरोबर गुलगुल बोलत होता.याचा व्हायचा तो परिणाम झाला.ते दोघे ही एकांतात बोलत होते,भेटत होते.त्याच्या मनात तिला आपल्या अंगाखाली घेऊन तिला कुस्करायचे असल्याने त्या संधीच्या शोधात तो होता.

एकदा त्याला तशी संधी मिळाली.अलकाचा नवरा पाराजी हा घरी नसताना तो तिच्या घरात गेला.ती घरात एकटीच होती. सुरूवातीला ते दोघे बोलत बसले असताना तो काय वहिनी काय आहे की नाही म्हणत त्याने बोलता बोलता तिची मांडी दाबून तिला डोळ्याने खुणावले.तिला ही तिच्या नवऱ्याकडून पाहिजे तसे सुख भेटत नसल्याने ती ही त्या सुखाला आसुसलेली होती.ती ही नाही होय म्हणत त्याच्या बरोबर ते सुख घ्यायला तयार झाल्यावर त्याने तिला खाटेवर आडवी करत तो तिच्यावर स्वार झाला.त्याने तिला आपल्या अंगाखाली घेत मस्तपैकी कुस्करले.त्याच्या त्या सुखाने ती ही मोहरून निघाली.आतापर्यत तिला असे सुख तिच्या नवऱ्याकडून तिला मिळाले नसल्याने ती त्याचेवर खुश झाली.त्या दिवसापासून त्या दोघांचे ते संबंध सुरू झाले.तो तिचा नवरा घरी नसताना कधी ही तिच्या घरी येत होता.तिला आपल्या अंगाखाली घेऊन मस्त मजा मारत होता.त्या दोघांच्या संबंधाची भणक त्याच्या शेजाऱ्यांना लागल्याने त्याच्या त्या संबंधाची चर्चा ही गावात होऊ लागली.ही चर्चा पाराजीच्या कानावर आल्यावर तो अलकावर चिडला.त्याने याचा जाब तिला विचारला असता तिने त्याला गोड बोलून आपले तसले संबंध कोणाबरोबर नाहीत गावातील लोक काय वाटेल ते बोंबलतात तुम्ही त्याचेकडे लक्ष देवू नका.माझ्यावर तुमचा विश्वास आहे ना असे विचारून त्याला गप्प बसविले.सुरूवातीला त्याने ही तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. परंतु त्याच्या माघारी राजेंद्र भोरे याचे अलकाकडे येणे जाणे चालूच असल्याने त्या दोघांचे संबंध वाढीस लागलेले होते.पाराजी आणि अलका याचेत आता या कारणातून त्याचेत भांडणे होऊ लागली होती.पाराजी हा तिला दररोज दारू पिऊन येवून मारहाण करीत होता.भांडणात तो तिला जा त्याचेकडे त्याच्याबरोबरच झोप जा.त्याचेबरोबरच मजा मार जा असे म्हणत होता.नवरा बायकोच्या भांडणाला अंत राहिला नव्हता.भांडणात ती त्याला सोडून आपल्या मुलांना घेऊन माहेरी निघून गेली होती.त्यावेळी पाहुण्यांनी त्या दोघांची समजूत काढून त्यांची भांडणे मिटवली होती.ती परत पाराजीकडे राहयला आली. इकडे राजेंद्र आणि तिच्या त्या संबंधाची गावात चर्चा ही होतच होती.त्यामुळे पाराजीची होती नव्हती तेवढी अब्रु गेली होती. त्याच्यामुळे गावात आपली बदनामी झाली आहे याची खंत त्याला होती.त्यामुळे तो राजेंद्रवर चिडून होता.त्या दोघांचे संबंध वाढीस लागलेले असताना पाराजीची पत्नी अलका ही राजेंद्रला सोडयला तयार नव्हती.बायको ही आपले ऐकत नाही शिवाय भोरे मुळे गावात आपल्याला मान खाली घालायला लागत आहे त्यामुळे पाराजीच्या मनाला लागून राहिले होते.काही तरी करून यातून मार्ग काढायला पाहिजे असा त्याने विचार केला.भोरे याच्यामुळे गावात आपली बदनामी झाली आहे त्यामुळे त्याला अद्दल ही घडवलीच पाहिजे.त्याशिवाय या संबंधाचा अंत होणार नाही हे त्याने ओळखले होते.

राजेंद्र भोरे हा सकाळी सकाळी मॉर्निग वॉकला जात असतो हे त्याला माहित होते.सोमवार दि.२४ रोजी संपुर्ण देशात दिवाळी मोठया उत्साहाने साजरी होत होती.त्या दिवशी राजेंद्र भोरे होळकर नगरातून मार्निग वॉकला बाहेर पडला.तो चौकात आला असता त्याचेसमोर अचानकपणे पाराजी हा आला.त्याचे हातात धारदार चाकू होता.त्याच्या डोळ्यात अंगार होता.त्याचेकडे रागाने बघत पाराजी त्याला म्हणाला तू माझ्या बायकोबरोबर संबंध ठेवतोस काय? थांब तुला आता वरतीच पाठवितो.वरती जावून तू आता संबंध ठेव असे म्हणत त्याने त्याच्या छातीवर बरगडयावर आणि पोटावर आपल्याकडील चाकूने सपा सपा वार केले.

क्राईम संध्या | सोमवार दि. ३१ ऑक्टोंबर २०२२ ते रविवार दि. ०१ नोव्हेंबर २०२२ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ३

### माणिकपूर पोलिस गुन्हे प्रकटीकरण पथकाची उत्कृष्ट कामगिरी

## शेतकऱ्याची फसवणूक करुन पोबारा करणारा गुन्हेगार ४८ तासात गजाआड

**वसई/प्रतिनिधी**

आस्मानी आणि सुलतानी संकटामुळे महाराष्ट्रातील शेतकरी कर्जबाजारी होऊन देशोधडीला लागलेला असतानाच या गरीब शेतकऱ्याची काही भामट्यांकडून फसवणूक होत आहे. नाशिक मधील अशाच एका फूल उत्पादक शेतकऱ्याला वसई मध्ये एका भामट्याने ५४ हजारांचा गंडा घातला. मात्र वसई माणिकपूर पोलिसांनी अवघ्या ४८ तासात या भामट्याच्या मुसक्या आवळल्या. गेल्या आठवड्यात वसई माणिकपूर पोलिसांनी वसई रेल्वे स्थानकाजवळ भाजी आणायला गेलेल्या एका वृध्द महिलेला ५५ हजारांचे दागिने लंपास करणाऱ्या चोरानाही शिताफीने अटक केली आहे. लागोपाठच्या या घटनांमधील आरोपींना जेरबंद केल्याबद्दल वसईकरांनी माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील आणि त्यांचे सहकारी पोलीस कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. नाशिक जवळच्या मुरळ गावातील फूल उत्पादक शेतकरी केशव नामदेव जगताप हे दिवाळी निमित कल्याणच्या फूल मार्केटमध्ये झेंडूची फुले विकायला आले होते. याच दरम्यान एका अनोळखी इसमाने त्यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या कडची ५४ हजारांची फुले विकत घेतली. मात्र ती वसई येथे द्यायला सांगितली त्यानुसार जगताप वसईच्या अंबाडी रोडवरील गुरुद्वाराजवळ झेंडूच्या फुलांची डिल्हेवरी घेऊन आले. त्यानंतर त्या इसमाने जगताप यांनी आणलेली झेंडूची फुले काही



गोण्यांमध्ये भरून टेंपोत टाकली आणि पाच मिनिटात पैसे घेऊन येतो असे सांगून ५४ हजारांची फुले घेऊन पोबारा केला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच जगताप यांनी माणिकपूर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली त्यानुसार गु.र.क्र३८२/२०२२ कलम ४२०,भा.द.वी.स. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील यांनी सदर गुन्ह्याची गांभिर्याने दखल घेऊन आपल्या वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु केला आणि अवघ्या ४८ तासात नालासोपारा पुर्व येथून आरोपी अरविंद सूरसिंग चेकलीया ३२ याला अटक केली.

सदरची कारवाई पोलीस उपयुक्त संजीवकुमार पाटील विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्त पद्मजा बडे यांच्या मार्गदर्शनाखाली माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि.सानप, पो.उ.नी. तुकाराम भोपळे, प्रकाश कदम, पो.ह. शैलेश पाटील, श्यामेश चंदनशिवे, अनिल चव्हाण, पो.अ. कांदे यांनी पार पाडली.

# माजी आमदार सुरेश लाड आगामी विधानसभा लढवणार!

## राष्ट्रवादीच्या ईच्छुकांचा भुमिकेकडे राजकीय दुनियेचे लक्ष!



**कर्जत/धर्मानंद गायकवाड**

रायगड जिल्ह्यातील कर्जत मतदार संघाचे माजी आमदार सुरेश लाड यांनी आज कर्जतचा राजकीय दुनियेत खळबळ उडवून दिली. कर्जत विधानसभा मतदार संघातुन आगामी विधानसभा निवडणुक लढविणार असल्याची घोषणा माजी आमदार सुरेश लाड यांनी केली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी पक्षातुन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीची तयारी करणारे, काय भुमिका घेणार? याकडे संपुर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागुन राहीले आहे. कर्जत विधानसभा मतदार संघाचे तीन वेळा प्रतिनिधीत्व करणारे माजी आमदार सुरेश लाड यांना २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत तत्कालीन सेनेचे उमेदवार महेंद्र थोरवे यांनी पराभूत केले, त्यानंतर माजी आमदार सुरेश लाड शांत होते, जनतेमध्येही माजी आमदार सुरेश लाड यांचा संपर्क कमी झाला होता, त्यामुळे माजी आमदार सुरेश लाड आता राजकारणात सल्लागार म्हणुन भुमिका बजावतील अशी चर्चा होती, मात्र काल माजी आमदार सुरेश लाड पुन्हा सक्रिय झाले असुन आगामी विधानसभा निवडणुक आपण लढविणार असल्याची घोषणाच माजी आमदार लाड यांनी केली. त्यामुळे राष्ट्रवादीतुन २०२४ ची निवडणुक लढविण्याची तयारी करणारेंना मोठा हादरा बसला आहे, विशेष म्हणजे रायगड जिल्हा परीषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे हेही राष्ट्रवादीतुन कर्जत विधानसभा मतदार संघातुन निवडणुक लढविणेची जोरदार तयारी करीत आसल्याचे दिसुन येते, आगामी विधानसभा निवडणुकीचे भावी उमेदवार म्हणुन सुधाकर घारे यांचेकडे पाहीले जात आहे, संपुर्ण कर्जत खालापुर तालुक्यांत घारे सक्रिय कामही करीत आहेत, त्यामुळे राष्ट्रवादीचे २०२४ चे उमेदवार सुधाकर घारे असतील असे राजकीय दुनियेत बोलले जात होते, मात्र कर्जतचे माजी आमदार तथा राष्ट्रवादीचे नेते माजी आमदार सुरेश लाड यांनी ते आगामी विधानसभा निवडणुक स्वता लढविणार असल्याची घोषणा केली आहे, तीन वेळा निवडणुक लढवुन माजी आमदार सुरेश लाड निवडुण आले आहेत, त्यामुळे माजी आमदार सुरेश लाड यांनाच पक्षाची अधिक्रुत उमेदवारी मिळेन असा सुर राजकीय तज्ञ काढत आहेत.

दरम्यान कर्जतचे बाळासाहेबांची शिवसेना पक्षात गेलेले कर्जतचे विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांच्या विरोधात आगामी विधानसभा निवडणुकीत सुरेश लाड राष्ट्रवादीचे उमेदवार असतील अशी चर्चा आता राजकीय दुनियेत आहे, त्यामुळे कर्जत विधानसभा निवडणुकीची तयारी करणारे राष्ट्रवादीचे सुधाकर घारे यांनी मतदार संघात निर्माण केलेली राजकीय ताकद घारे लाड यांचा मागे उभी करतात की अन्य काय भुमिका घेतात? याकडे संपुर्ण राजकीय दुनियेचे लक्ष लागुन राहीले आहे.

तसेच कर्जत तालुक्यांतील पोटल ग्रामपंचायत निवडणुकीमधे महाविकास आघीडीला मिळालेल्या यशामुळे आता राष्ट्रवादीचा आत्मविश्वास वाढला आहे, विधानसभा निवडणुकही महाविकास आघाडीने एकत्रित लढविल्यास महाविकास आघाडीचे उमेदवाराचे मोठे आवाहन आगामी विधानसभा निवडणुकीत कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांचा समोर उभे ठाकणार आहे. कर्जतचे माजी आमदार सुरेश लाड यांची पुन्हा निवडणुक रिंगणात एन्ट्री झाल्याने कर्जतचे राजकारण आता पुन्हा तापणार आहे.

## जिल्हा बँक व सोसायटी कार्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन



**देवणी/प्रतिनिधी**

दवणहिप्परगा ता.देवणी येथे पाडव्याच्या मुहूर्तावर सोसायटीच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या जिल्हा बँक व सोसायटी कार्यालयाच्या नुतन ईमारतीच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम जिल्हा बँकेचे संचालक भगवान पाटील तळेगावकर व दिलीप पाटील नागराळकर यांच्या हस्ते विधीवत पूजा व श्रीफळ फोडून करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच बाबुराव पाटील तर जिल्हा बँकेचे सरव्यवस्थापक तानाजी जाधव , दिगंबर संगमे, मधुकरअप्पा चिद्रे, विमल ताई शाळेचे मुख्यद्यापक धनराज चिद्रे,शाखा व्यवस्थापक संदीप बुळ्ळा, निरिक्षक सचिन मुळे, गटसचिव रसूल शेख, सोसायटी अध्यक्ष अविनाश पाटील, उपाध्यक्ष दैवशाला टिळे, संचालक सतिष पाटे,विजय पाटील, दत्तू खिंडे, धनराज पाटील, प्रशांत पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात गणेश चव्हाण आणि कु.पद्मजा पांचाळ यांचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा शल्यचिकित्सक, लातूर कार्यालय अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक लातूर आणि जयक्रांती महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने एच.आय.व्ही./एड्स जनजागरणाकरिता जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेमध्ये समाजकार्य विभागातील गणेश चव्हाण आणि कु.पद्मजा पांचाळ यांनी द्वितीय पारितोषिक रु.२००० रोख आणि प्रमाणपत्र प्राप्त केले. त्याबद्दल विजेत्या स्पर्धकांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ.दिनेश मौने, प्रा.काशिनाथ पवार, डॉ.संजय गवई,



डॉ.आनंद शेवाळे आणि प्रा.रविंद्र सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी या दोन्ही विजेत्या स्पर्धक विद्यार्थ्याचे श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूरचे सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, सर्व उपप्राचार्य, सर्व शाखा समन्वयक, सर्व विभाग प्रमुख, समाजकार्य विभागातील प्रा.आशिष स्वामी, प्रा.दत्ता करंडे, प्रा.नागेश जाधव, प्रा.मारुती माळी, गणेश शेटे, वीरसेन उटगे, नंदू काजापुरे, बालाजी डावकरे, व्ही.एन.वलांडे, संतोष येचवाड यांच्यासह समाजकार्य विभागातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## सांगे-नाणे ग्रुप ग्रामपंचायत उपसरपंचपदी भुषण पाटील बिनविरोध




**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यामध्ये सांगे- नाणे ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी युवा कार्यकर्ते भूषण पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सरपंच जनतेतून निवडून आलेले दुर्वास कामडी यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी ग्रामपंचायतची सांगे येथे विशेष सभा घेण्यात आली होती. उपसरपंचपदासाठी भुषण पाटील यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड निवडणूक निर्णय अधिकारी वाडा पंचायत समिती बांधकाम विभागाचे अभियंता अंकुश निमजे यांनी भुषण पाटील यांचे नाव जाहिर केले. यावेळी ग्रामसेविका शितल पाटील, नवनिर्वाचित सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते. पाटील हे बिनविरोध निवडून आल्यानंतर सर्वांना बरोबर घेऊन सांगे-नाणे गावाचा विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. त्याचप्रमाणे गावाच्या सुखसुविधा व विकासकामे करण्यात येतील असे नवनिर्वाचित उपसरपंच भुषण पाटील यांनी सांगितले.

## भिवंडीत १००० महिलां सोबत जिजाऊ संघटनेने साजरी केली कृतज्ञता भाऊबीज



**भिवंडी/प्रतिनिधी**

आशा वर्कर्स अंगणवाडी सेविका या खऱ्या समाजासाठी झटणाऱ्या रणरागिणी असून त्यांच्या पाठीशी समाजाने उभे राहणे गरजेचे आहे असे प्रतिपादन जिजाऊ शैक्षणिक सामाजिक संस्था महाराष्ट्र चे संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे यांनी केले आहे .ते भिवंडी पद्मानगर येथील पद्मशाली समाज सभागृह येथे आयोजित कृतज्ञता भाऊबीज कार्यक्रमात बोलत होते.याप्रसंगी पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालयाचे प्राचार्य सुधीर घागस, शिवअंगणवाडी सेनेच्या प्रदेश उपाध्यक्षा वैशाली मेस्त्री, शिवसेना बाळासाहेबांची गटाचे शहर उपाध्यक्ष संजय काबूकर, अखिल पद्मशाली समाज अध्यक्ष रामकृष्ण पोटाबत्तीनी, महानगरपालिकेच्या मुख्य आरोग्य अधिकारी डॉ बुशरा सय्यद,जिजाऊ संघटनेच्या ठाणे जिल्हाध्यक्षा मोनिका पानवे यांसह मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या. शैक्षणिक व राजकीय भ्रष्टाचार करणाऱ्यांना समजा बद्दल काही ही पडलेले नाही आशा परिस्थितीत जिजाऊ हा गरिबांचा कष्टकरी सर्वधर्मीय समाजाचे कुटुंब आहे, या मातीतला प्रत्येक जण आपला आहे, या भावनेतून निस्वार्थी भावनेतुन काम करण्याची गरज आहे आणि ते काम जिजाऊ करीत असल्याचा सार्थ अभिमान असल्याचे सांगत समाजचे काम करणारी पिढी आपल्याला घडवायची आहे ,पीडिताला मदत करणे आपली जबाबदारी आहे, सरकार करेल तेव्हा करेल समाजाच्या विकासासाठी मदत करायला पुढे येणे गरजेचे आहे असे शेवटी निलेश सांबरे यांनी स्पष्ट केले.

तुटलेली नाती निस्वार्थ भावनेने कशी जोडावी यासाठी निलेश सांबरे हे काम निस्वार्थी भावनेतून करीत आहेत,करोना काळात लाखो रुपये पगार घेणारे वर्क फ्रॉम होम होते तर तीन चार हजार रुपयांच्या तुटपुंजा मानधना वर काम करणाऱ्या आशा वर्कर्स अंगणवाडी सेविका यांचे काम धैर्याचे होते म्हणून हा कृतज्ञता भाऊबीज सोहळा आगळावेगळा आहे असे प्रतिपादन सुधीर घागस यांनी केले.

या कार्यक्रमा दरम्यान भिवंडी शहर व भिवंडी तालुक्याच्या ग्रामीण भागात कार्यरत अंगणवाडी सेविका, मदतनीस आशा वर्कर्स अशा तब्बल एक हजार महिलांची पैठणी सह चांदीची जिजाऊ शिवबा ही प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला.

## टाका येथील दोन भावांची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड




**औसा**–औसा तालुक्यातील टाका येथील भूमिपुत्र महाराष्ट्र केसरी मध्ये उपविजेता ठरलेला शैलेश शेळके आणि त्यांचे सख्खे बंधू अक्षय शेळके या दोन्ही सख्या भावांची आता होणाऱ्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे मागील वर्षी शैलेश शेळके यांनी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेमध्ये उपविजेता पद पटकाविले होते या वर्षी परत त्यांची व त्यांचे बंधू अक्षय शेळके यांची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी वर्णी लागली असून औसा तालुक्यातील कुस्तीपटूं आणि क्रीडा प्रेमी नागरिकांतून अभिनंदन होत आहे शैलेश शेळके यांच्या यशाबद्दल आमदार अभिमन्यू पवार यांच्यासह समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

## बहुजनांचा समतावादी महानायक बळीराजा-डॉ. गणेश बेळंबे

**लातूर/प्रतिनिधी**

आपल्या प्रजेतील प्रत्येक व्यक्तीला तिच्या कष्टाचे व हक्काचे फळ सम्यक रीतीने विभागून देणारा निरागस न्यायी महापुरुष संविभागी राजा!! म्हणजे महासम्राट बळीराजा. भारतीयांचे वास्तव आणि विधायक पूर्वसंचित असलेला कृती, प्रकृती आणि संस्कृती यांचा तेजस्वी आध्यपुरुष बहुजनांचा समतावादी महानायक! सात काळजाच्या आत जपून ठेवावा असा बळीराजाच आपली विचारसरणी व आध्यसंस्कृति आहे असे स्पष्ट प्रतिपादन मराठा सेवा संघाचे जिल्हाकार्याध्यक्ष डॉ. गणेश बेळंबे यांनी केले.

जिल्हा मराठा सेवा संघ आयोजित छत्रपती शिवाजी महाराज चौक लातूर येथे बळीराजा उत्सव पूजन, ध्वजारोहण कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष रोहन जाधव होते प्रमुख उपस्थितीत जिजाऊ बिग्रेड जिल्हाध्यक्ष बोराडे ताई, समाधानताई माने, प्रा.विनोद चव्हाण, ऋषिकेश कदम, निखिल मोरे, प्रकाश लेनेकर, अनिल जांभळे, आदींची उपस्थिती होती.

डॉ गणेश बेळंबे यांनी बळीराजा उत्सव का गरजेचा आहे स्पष्ट करताना त्यानी सांगितले की भारताच्या सांस्कृतिक इतिहासातील एक अत्यंत उत्तुंग व्यक्तिमत्त्व! सुमारे साडे तीन ते पाच हजार वर्षापूर्वी होवून गेलेला भारतीय बहुजन समाजाचा एक महानायक, एक महासम्राट, एक महातत्त्ववेत्ता! या बळीचा वंश तो बळीवंश. या बळीवंशातील माणसे- आपली माणसे, आपल्या रक्तामांसाची माणसे आणि मुख्य म्हणजे आपल्या विचारांची माणसे! ज्यांनी स्वातंत्र्यासाठी आपले प्राण गमावणे पत्करले, पण तत्त्वांशी द्रोह केला नाही, आपल्या श्वासोच्छवासावर दडपणे लादून घेणे मान्य केले नाही, अशी माणसे. आपण मात्र असे धन्य, कि आपण आपल्या डोळ्यांदेखत त्यांच्या स्मृतींना खुशाल करपू-कोमेजू दिले; त्यांना आपल्या हृदयापासून सात तटांच्या आणि मस्तकांपासून सात उंबरठ्याच्या बाहेरच रोखून धरले. या सगळ्याला थोडे अपवाद असतील, पण इतरांपैकी काही जणांनी त्यांना विसरून जाण्यात आपले सुख शोधले आणि काही जणांनी तर त्यांची निंदा



करण्यात पुण्याचा मार्ग पाहिला.पण वास्तव बळी हा आपला कुलस्वामी आहे असे महात्मा फुले सांगतात.

महात्मा फुले यांनी दस्युचा पोवाडा म्हणून जो पोवाडा लिहिला आहे, त्याच्या तिसऱ्या कडव्याची सुरुवातच त्यांनी बळी राज्यादी कुळस्वामिला या शब्दांनी केली आहे. येथे राज्यादी हा शब्द राजादी या अर्थाने आला आहे. कारण, बळीच्या राज्याला कुळस्वामी म्हणणे, हे आशयाच्या दृष्टीने जुळत नही. याउलट बळीराजाचा तसं निर्देश करणे हे मात्र पूर्णपणे सुसंगत ठरते. महात्मा फुले बळीराजाला कुलस्वामी मानतात, याचाच अर्थ ते त्याला आपला अत्यंत आदरणीय पूर्वज मानतात. या उल्लेखाद्वारे ते एक प्रकारे बळीराजाबरोबरचे आपले नातेच सांगून टाकतात. कुळस्वामिकडे हल्ली देवता म्हणून पहिले जात असले, तरी कुळस्वामी म्हणजे मूळ पुरुष, हाच खराखुरा अर्थ आहे, हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. बळी राज्यादी कुळस्वामिला, डाग लाविला, दंग क्लेशांत! अन्नावाचून होती हाल, केली कमाल, सर्व जगात! त्यामुळेच आजही दिवाळीला इडा पीडा टालूनीया बळीचे राज्य येवो असा उदघोष होतो ती संस्कृती जपून सास्कृतीक दहशतवाद मोडून काढल्याशिवाय बळीराज्य येणार नाही त्यासाठी आपण सतर्क राहूया असे प्रतिपादन डॉ. गणेश बेळंबे यांनी केले. प्रारंभी बळीराजा प्रतिमेचे पूजन करून पणती प्रकाश पेरून पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ऋषिकेश कदम यांनी केले तर आभार थोरात यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आनील जांभळे अभिमन्यू जगदाळे, नाना जाधव, धनंजय शेळके यांचे सहकार्य लाभले कार्यक्रमास बहुसंख्येने गर्दी होती.

## सहकारी साखर कारखाना चे विभागीय कार्यालय सुरु

**देवणी**–भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्राचे नेते माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते व ओंकार साखर कारखाना लिमिटेडचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या उपस्थितीत पाडव्याच्या शुभ दिनी देवणी येथे डॉ शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखान्याचे विभागीय कार्यालय सुरू करण्यात आले, या कार्यक्रमास ऊस उत्पादक शेतकऱ्याचा प्रचंड प्रतिसाद होता तसेच यावेळी भाजपा चे ज्येष्ठ नेते हावगिराव पाटील, मनोहर पटने, काशिनाथ गरीबे, यशवंतराव पाटील, बसवराज पाटील, दगडु चेअरमन, बाबुराव इंगोले, शंकर पाटील तळेगावकर, वैजनाथ



अस्टुरे,किशोर निडवंचे, विजयकुमार लुल्ले, अशोक लूल्ले, लक्ष्मण डोपेवाड,प्रशांत पाटील जवळगेकर, बालाजी बिरादार, रामलिंग शेरे, ओम धनुरे, अमर पाटील, चंद्रशेखर महाजन,अलीम शेख, सलीम उंटवाले, ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन, व आभार प्रशांत श्रीपतराव पाटील दवणहिप्पर्गेकर यांनी केले.

## वाडा शहरात अनधिकृत बॅनरचा वाहतूकिस अडथळा

**वाडा**–वाडा शहरातील खंडेश्वरी नाका ते परळी नाका दरम्यान रस्ता रुंदीकरण करून सिमेंट कॉंक्रिटचा रस्ता बनवला असला तरी वाहतूक कोंडी काही सुटत नाही. काही ठिकाणी रस्ता रुंदीकरणाचे अपूर्ण काम, अपूर्ण गटारी तर काही ठिकाणी विद्युत पोल हलवले नसल्याने या पोलचा आधार घेऊन थाटलेल्या हाथ गाड्या, फेरीवाले, बेजबाबदार पणे गाड्या लावनारे वाहनचालक व दुकानदारांच्या मालाच्या गाड्यांची पार्किंग याच सोबत आता दिवाळी सना निमित्त वेगवेगळ्या ऑफरचे अनधिकृत बॅनरही वाहतूक कोंडीची समस्या बनत आहेत. मशीद नाका ते बस स्थानका पर्यत जाण्यासाठी अवघे पाच ते सात मिनिटे



लागतात मात्र गुरुवारी एका बॅनरमुळे अडथळा होऊन सात मिनिटांच्या या अंतरला विस मिनिटे लागली. वाडा नगरपंचायतीने वाहतूकीस अडथला ठरनाऱ्या बॅनरबाजीला आळा घालून त्यांच्यावर कारवाईची मागणी होत आहे. तसेच वाहतूकिवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याचीही मागणी होत आहे.

# नोटा वरील फोटोंचे राजकारण

आजकाल राजकारणात चमकेश लोकांचा मोठ्या प्रमाणावर भरणा झालेले आहे. त्यामुळे एखाद्या कार्यकर्त्याला पक्षाचे गल्लीतले पद जरी मिळाले तरी दुसऱ्या दिवशी नाक्यावर त्याच्या अभिनंदनाचे पोस्टर बॅनर्स लागतात. त्यामुळे राजकारणात पोस्टरबोय सारख्या नव्या संस्कृतीचा उगम झालेला आहे. अर्थात पोस्टर वरील चमकेशगिरी ठीक आहे. पण नोटांवर नेत्यांचे फोटो ही कल्पनाच संतापजनक आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी याच्यासारख्या त्यागी आणि पूर्णपणे स्वातंत्र्य संग्रामाला वाहून घेतलेल्या महात्म्याचा नोटांवर फोटो आहे हे समजू शकते पण गांधीजींचा फोटो काढून ह्याच्या जागी वंदनीय बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, गौतम बुद्ध यासारख्या महापुरुषांच्या नावाचा आग्रह धरणे म्हणजे एक प्रकारे त्यांचा अपमान करण्यासारखे आहे छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही देशवासीयांची आराध्य दैवते आहेत आणि त्यांची जागा प्रत्येकाच्या हृदयात आहे. तिथून त्यांना कुणीही हटवू शकणार नाही. आणि म्हणूनच त्यांचा नोटांवर फोटो छापण्याचा आग्रह कुणी धरू नये. कारण चलन हे घात की आहे. नोटांमुळे लोकांचे खून होतात. भ्रष्टाचार होतो. नोटा मुळे कधकधी रक्ताची नाती तुटतात. परिणामी नोटांमधे आजकाल लक्ष्मीचा वास राहिलेला नाही. लक्ष्मी माता चांगल्या ठिकाणी वास्तव्य करते. चांगल्या लोकांच्या पाठीशी सदैव उभी असते त्यामुळे नोटा किंवा अन्य धन संपत्ती मध्ये कुणी लक्ष्मीला पाहू नये. लक्ष्मी माता पवित्र आहे. संपती मधून निर्माण झालेली पापे तिच्या जवळपासही फिरकू शकत नाहीत त्यामुळे नोटांवर लक्ष्मीचा सुधा फोटो नको. काही लोकांनी नोटांवर मोदींचा फोटो लावण्याची मागणी केली आहे. हा तर अतिशयोक्तीचां कळस आहे. मोदींनी असे कोणते महान कार्य केले आहे की, त्यामुळे नोटांवर त्यांचा फोटो छापयचा, काही लोक सध्या जाणूनबुजून मोदींची महात्मा गांधींशी तुलना करण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यातूनच नोटोंवर मोदींचा फोटो छापण्याची मागणी पुढे आली आहे. पण ती कदापि मान्य होणार नाही आणि केंद्राने जबरदस्तीने तसा प्रयत्नही करू नये. कारण मोदींची कोणत्याही दृष्टीने गांधींशी तुलना होऊच शकत नाही हे मोदींच्या अंध भक्तांनी ध्यानात ठेवावे भारताच्या स्वातंत्र्या नंतर जेंव्हा चलन अस्तित्वात आले तेंव्हा १ रुपयाच्या नोटा पासून १०० रुपयांच्या नोटा पर्यत वेग वेगळे फोटो नोटांवर असायचे यात प्राण्यांपासून कृषी क्षेत्राशी संबंधित वस्तूंचा समावेश असायचा. १९६९ साली गांधी जन्मशताब्दी निमित्ताने नोटांवर गांधीजींचा फोटो आला आणि तो आज पर्यत आहे १९८७ साली रिझर्व्ह बँकेने ५०० रुपयाची नोट काढली त्यावरही गांधीजींचा फोटो होता. जगभरातील चलनावर त्या-त्या देशातील थोर नेत्यांचे फोटो छापले जातात. पाकिस्तानी चलनावर जसा मोहंमद अल्ली जीनांचा फोटो आहे त्याच प्रमाणे भारतीय चलनातील नोटांवर महात्मा गांधींचं चित्र आहे. गांधीजींनी या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी काय-काय केले हे वेगळे सांगायची गरज नाही आणि म्हणूनच नोटांवर गांधीजींचा फोटो ठेवण्यास इतक्या वर्षात कुणीही विरोध केला नाही कारण गाधिंच्या विषयी सर्व भारतीयांच्या मनात आदर आहे. गाधिंजी सर्वमान्य आहेत. पण जेंव्हा पासून या देशात हिंदुत्वाचे वारे वाहू लागले तेंव्हापासून अनेकांच्या नजरेत गांधींचे मोठेपण खुपू लागले. काही हिंदुत्ववाद्यांना तर गांधीजी पेक्षा नथुराम गोडसे अधिक प्रिय आहे. त्यामुळे नथुरामचे उदाती करण सुरू आहे. आणि यातूनच नोटेवरून गाधिजिंचा फोटो हटवण्याचे कारस्थान शिजू लागले आहे.

मात्र नोटांवर कोणाचा फोटो असावा हे ठरवण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेला आहे. आणि अजूनतरी रिझर्व्ह बँकेत हिंदुत्ववाद शिरलेला नसल्याने नोटांवर गांधीजींचा फोटो असेल तो हटवला जाणार नाही असे रिझर्व्ह बँकेने स्पष्ट केले आहे रिझर्व्ह बँकेचा हा निर्णय भारताचे संविधान आणि सर्वधर्म समावेशक प्रतिमेला याना अनुसरून आहे त्यामुळे नोटांवर कोणाचा फोटो असावा हा वाद आता थांबवायला हवा राजकारण, धर्मकारण आणि अर्थकारण या तीन वेग वेगळ्या गोष्टी आहेत. असे असताना काही लोक त्याची भेसळ करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या देशात काही गोष्टी अशा आहेत ज्याचा धर्माशी संबंध जोडून लोकांना भडकवले जात आहे. आणि त्यातूनच नोटांवर लक्ष्मी आणि गणेश यांचे फोटो असावेत अशी मागणी पुढे आलीय अर्थात ही मागणी एखाद्या हिंदुत्ववाद्यांनी केली असती तर ते समजण्यासारखे होते.पण ही मागणी केलीय आम् आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांनी! आता काय म्हणावे अशा लोकांना? केजरीवाल यांचे लक्ष गुजरातमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीकडे आहे. पण त्यासाठी इतक्या खालच्या थराला जाणे योग्य नाही. केजरीवाल यांच्याकडे देशवासी मोदींना एक पर्याय म्हणून बघत आहेत अशावेळी केजरीवाल केवळ एका राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा विचार करून जर आपल्या मूळ धोरणाकडे पाठ फिरविणार असतील तर त्यांच्यात आणि हिंदुत्ववाद्यांच्या फरक तो काय त्यांची नोटांवर गणपती आणि लक्ष्मीची चित्रे छापण्याची मागणी एक हिंदू म्हणून आम्हालाही मान्य आहे पण त्यांच्या मागणी नंतर नोटांवर इतरांचे फोटो छापण्याच्या ज्या मागण्या होऊ लागल्यात त्याचे काय? नोटांवर इतरांचे फोटो छापण्याची मागणी करण्यापेक्षा नोटांचा जो भाव वधारला आहे आणि त्यातून जीवनावश्यक वस्तूंच्या किमती लोकांच्या खिशातील नोटांपेक्षा भारी झाल्यात त्याच्याविषयी राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते का बोलत नाहीत? भारतीय चलन हे आंतरराष्टीय पातळीवर कशा प्रकारे आपला दर्जा वाढविल हि विचार करण्याची गरज आहे, देवी-देवतांचे फोटो नोटांवर छापणे ही नाही, कारण ही खरी लोकांची गरज आहे.

# जाणून घेवू या उच्च शिक्षणासाठी व्याज परतावा योजना!!

राज्य, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या इमाव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी बँकेने मंजूर केलेल्या २० लाख रुपयापर्यत कर्ज रकमेवरील व्याज परतावा देण्याची योजना महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्यावतीने राबविली जात आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक, आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आणि त्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहीत करणे, हा योजनेचा उद्देश आहे. राज्यांतर्गत आणि देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी या योजनेत जास्तीत जास्त १० लाख रुपये कर्ज मर्यादा आहे, तर परदेशी अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त २० लाख रुपये कर्ज मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. बँकेकडून वितरीत केलेल्या शैक्षणिक कर्जाच्या मर्यादेत रकमेवरील जास्तीत जास्त १२ टक्क्यापर्यत रकमेचा व्याज परतावा नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्यात येतो.

राज्यांतर्गत अभ्यासक्रमामध्ये केंद्रीय परिषद, कृषी विद्यापीठ परिषद, शासकीय अनुदानित आणि खाजगी मान्यताप्राप्त (छउ मानांकन प्राप्त) शैक्षणिक संस्थेत अभ्यासक्रमासाठी शासनमान्य सामाईक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि त्यानुसार प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळतो. तसेच देशांतर्गत अभ्यासक्रमामध्ये देशातील नामांकीत संस्थेत प्रवेश घेतलेले विद्यार्थी योजनेसाठी पात्र असून परदेशी अभ्यासक्रमासाठी क्यूएस (टींरलींरीलश्रश्रळ ड्रोपवी) रॅंकिंग / गुणवत्ता, पात्रता परिक्षा, ग्रॅज्युएट रेकॉर्ड परीक्षा (ऋठए), टेस्ट ऑफ इंग्लिश ॲज फॉरेन लॅंग्वेज (ढजएऋङ)उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जातो.

**ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या शैक्षणिक कर्जावरील व्याज परतावा योजनेचा लाभ घेण्यासाठी महामंडळाच्या वेबपोर्टलवर अर्ज करणे बंधनकारक आहे. अर्जदाराचे वय १७ ते २० वर्ष असावे आणि तो इतर मागास प्रवर्गातील महाराष्ट्राचा रहिवासी असावा. अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण आणि शहरी भागाकरिता ८ लाख रुपयापर्यत आहे. अर्जदार हा बारावी ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. पदवीच्या व्दितीय वर्ष व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी ६० टक्के गुणांसह पदवीका उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. केवळ पदवी आणि पदव्युत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमाकरिता शासन मान्यता प्राप्त संस्थेमध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी असणे आवश्यक आहे.अर्जदार कोणत्याही वित्तीय संस्थेचा, बॅकेचा थकबाकीदार असू नये. तसेच अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी असल्यास अर्जदाराचे पालक थकबाकीदार नसावेत. बँकेने मंजूर केलेली संपूर्ण कर्ज रक्कम अर्जदारास वितरीत केल्यानंतर अर्जदार व्याज परतावा योजनेसाठी पात्र राहतील. अर्जदाराकडून प्राप्त प्रस्तावास जिल्हा लाभार्थी निवड समितीची मान्यता घेवून महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक हा प्रस्ताव मुख्यालयास मंजुरीकरिता पाठवतील. मुख्यालयस्तरावर तपासणी झाल्यानंतर ऑनलाईन पात्रता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येतो. हे पात्रता प्रमाणपत्र फक्त सहा महिने कालावधीकरिता वैध असते. महामंडळाने निर्गमित केलेले पात्रता प्रमाणपत्र आणि ऑनलाईन केलेल्या अर्जाची प्रत अर्जदारास स्वतः बँकेकडे सादर करावी लागते. बँकेचे कर्ज मंजुरी पत्र आणि कर्ज वितरण प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने अपलोड करावे लागते. शैक्षणिक कर्जाची दरमहा नियमित परतफेड आवश्यक आहे. व्याज परतावा मागणीसाठी अर्जदाराने दरमहा बॅक कर्ज खाते उतारा संगणक प्रणालीवर किंवा वेबपोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. अर्जदाराने थकीत रक्कमेचा भरणा केल्यास अर्जदारास लगतच्या परतफेड केलेल्या व्याजाच्या हप्त्याचा परतावा देय असतो.

राज्य आणि देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याकरिता शैक्षणिक शुल्क, पुस्तके, साहित्य खरेदीचा समावेश आहे. परदेशी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याकरिता फक्त शैक्षणिक शुल्क, पुस्तके, साहित्य खरेदीचा समावेश आहे. अर्जदाराचा सिबील क्रेडिट स्कोर ०, -१ (म्हणजेच यापुर्वी त्याने कर्ज घेतलेले नसावे) किंवा ५०० पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

**कर्ज प्रस्तावासोबत अपलोड करावयाची कागदपत्रे**

अर्जदाराचा इतर मागास प्रवर्गातील जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, महाराष्ट्राचा रहिवाशी दाखला (ऊेळलळश्रश), अर्जदार आणि अर्जदाराचे पालक यांचे आधार कार्ड (त्रीपीं इरलज्ञीळवश), ज्या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक कर्ज आवश्यक आहे, त्या अभ्यासक्रमासाठीची पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका, अर्जदार आणि अर्जदाराचे पालक यांचे पासपोर्ट आकारातील फोटो, अर्जदाराचा जन्माचा, वयाचा दाखला, शैक्षणिक शुल्क संबंधीत पत्र, शिष्यवृत्ती (डलहेश्ररींहळ), शैक्षणिक शुल्कमाफी (त्रीशशीहळ) पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र, मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेश घेतल्याचा पुरावा, आधार संलग्न बँक खाते पुरावा तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची आवश्यकता आहे. ही कागदपत्रे कर्जाच्या प्रस्तावासोबत कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक आहे.

**व्याज परतावा व परतफेडीचा कालावधी**

शिक्षण पूर्ण केलेल्या अर्जदाराचे बँकेने मंजूर केलेल्या कर्जाची परतफेड केलेल्या हप्त्यामधील नियमित असलेल्या व्याज रकमेचा परतावा (कमाल १२ टक्केपर्यत) महामंडळ अर्जदाराच्या आधार सलग्न बॅक खात्यामध्ये वर्ग केली जाते. व्याज परताव्यासाठी जास्तीत जास्त पाच वर्ष कालावधी ग्राह्य धरण्यात येतो. योजनेच्या अधिक माहीतीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या ु.ीललषवल.ीस या संकेतस्थळाला भेट द्यावी. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास मंडळाच्या जिल्हा कार्यालयातही या योजनेची माहिती उपलब्ध होईल.

**– युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, लातूर**

# शेतकऱ्यांना मारूनच, झाले महाभकास क्रांतीचे शिल्पकार!



ब्रिटिशांच्या तावडीतून भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी भारताच्या तीन बॅरिस्टर सुपुत्रांनी जीवन खर्ची घातले. खितपत पडलेल्या ग्रामीण भागाचे जीवनमान उंचावण्यासाठी, बॅरिस्टर महात्मा गांधी, बॅरिस्टर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, व बॅरिस्टर डॉ. पंजाबराव देशमुख, हेच या देशाचे महान नेते व थोर समाज सुधारक होते. आणि त्याच समान विचाराचे असलेले शाहू महाराज, ही सर्व विद्वान मंडळी, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कालांतराने सत्तेच्या बाहेर का पडली? हा खरा मोठा गहन प्रश्न आहे.? स्वातंत्र्य प्राप्तीसाठी ज्या सुपुत्राने आपल्या रक्ताचे पाणी केले. ग्रामीण भाग, समृद्ध बलशाली करण्यासाठी अहोरात्र झटले, ती सर्व महान विद्वान मंडळी, सत्तेच्या बाहेर का गेले? याचा विचार मात्र सामान्य जनतेनी कधीच केलेला नाही. सत्तेत राहुन शेतकरी, शेतमजुरांचे भले होणार नाही, ही पुढील काळाची पावले त्यांनी ओळखली. मूळ संविधानात परिशिष्ट ९ घेऊन बदल करण्यात आला व तसा १८ जून १९५१ ला पाहिली घटना दुरुस्ती करून ठराव सुद्धा पारित करण्यात आला. नवीन अस्तित्वात आलेले कायदे हे शेतकरी, शेतमजुरांना संपविण्या साठीच केलेली ही सुरुवात आहे असे त्यांनी हेरले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शेतकरी समृद्धीच्या व्यवस्थेला लागलेले ग्रहण त्यांनी ओळखले व ते बाहेर पडले. नेहरू नीती चाल, या महान विद्वानांच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. नंतर पुढे औद्योगिकरणाच्या झपाट्यात, शेतकरी मारण्याचे या देशात छडयंत्र सुरू झाले.

सत्ता हेच शहाणपण अशी गंगोत्री तयार झाली. तेव्हा पासूनच ग्रामीण भागाला भकास करणाऱ्यांची संख्या सत्तेच्या मोहाने वाढत गेली, मात्र सत्तेच्या विरोधात आवाज उठवणाऱ्याची संख्या ही नाममात्र होत गेली. सत्ताधीश आणि विरोधी पक्षांची मिलीभगत सुरू झाली व बॅरिस्टराच्या बुद्धिमत्तेचा पाला पाचोळा करण्यास सर्वात झाली. तेव्हापासूनच शेतकऱ्यांचे वाटोळे होण्याची सुरूवात झाली. ज्या देशात शेतकऱ्यांचे बेहाल करून देश चालविला गेला, अश्या लुटारु पंडिताची वर्णी लागली. या देशातला शेवटच्या घटकांचा कर्णधार अन्नदात्याला उपाशी ठेवून, पोटाची खळगी भरू न देता त्याला जीवनात्तून संपविण्याचे कटकारस्थान या स्वातंत्र्यप्रिय देशात रचण्यात आले. कालांतराने महा भकास योजनेच्या शिल्पकाराच्या हातात सत्ता राहीली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात- सुशिक्षित वर्गाने राजकारणाकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. नाहीतर अंगठेबहाद्दर, व अर्ध शिक्षित, अडाणी लोकांचे गुलाम व्हावे लागेल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या आर्थिक लुटीच्या व्यवस्थेची लढाई सुरू झाली. त्यामुळे लुटारूचा देश तयार झाला. औद्योगिक क्रांतीच्या नावाखाली शेतकऱ्यांनी आपले स्वतःचे दुःख पचवून तो इतरांच्या आनंदात सहभागी झाला. शेतकऱ्यांना लूटण्यासाठी भामटे राज्यकर्ते गावोगाव फिरू लागले. व आर्थिक प्रलोभने देऊन, सूट सबसिडीचे दिंडोरे पिटवून गावातील शेतकऱ्यांना नाचवणे सुरू झाले. शेतकऱ्यांच्या लुटीचा कल्ला वाढू नये. जनतेच्या लक्षात येऊ नये म्हणून शेतकऱ्यांना खिरापती वाटून तो कल्ला सतत दाबल्या गेला. असेच सत्ताधीशांनी, राज्यकर्त्यांनी नियोजन केले. यासाठीशेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव कमी दिल्या जात असल्यामुळे शेतकरी व शेतमजूर यांच्या जवळ पैसा शिल्लक राहत नाही म्हणून, खेडेगावात जिल्हा परिषद चे व जिल्हा पातळीवर सरकारी दवाखाने, व शाळा सुरू करण्यात आल्या. तेव्हापासूनच शेतकरी महाभकास क्रांतीची खरी सुरुवात झाली. राष्ट्रगीताची धून भोळ्याभाबड्या जनतेच्या कानावर टाकून, लूटमार सुरू झाली. ओ मेरे देश की धरती, सोना उगले- उगले हीरे मोती अशी क्रांती गीते गाजत राहिली.

तरी पण हा बळीराजा देशासाठी, बलिदान देऊन, स्वतःलाच संपवीत राहिला. शेतकऱ्यांच्या नावावर मोर्चे काढून सर्व राजकीय पक्ष आपल्या दुकानात माल भरत राहीले. राज्यकर्ते स्वतःच सत्तेत असून, या देशाचा नोकर असलेल्या जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्याची परंपरा सुरू झाली. जिल्हाधिकारी या विषयावर काय निर्णय घेणार. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना बेवखुप बनवणारी व्यवस्था सुरू झाली. गंगेचं पाणी उलट्या दिशेने वाहायला लागले. लुटारूच्या ग्यांगा व अड्डे तयार झाले. मात्र या देशाचा पोशिंदा, ही सर्व दिशाहीन व्यवस्था, आणि स्वतःच्या मुलाच्या प्रपंचाची होत असलेली राखरांगोळी, बळीराजा डोळ्यात पाणी आणून, केविलवाण्या नजरेने अंधकारमय जीवन सरकारच्या आशेवर पहातच राहिला. सत्तेतील राजकीय पक्षांनी फक्त शेतकऱ्यांचा जयघोष करून, उत्पादन वाढविण्याच्या नादात लावून, व शेतमालाला भाव कभी देऊन मातीत गाढले. राज्यकर्ते हेच महाभकास क्रांतीचे शिल्पकार झाले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजानी गुरुदेव आश्रम, नागपूर येथे २६ जानेवारी १९५० ला प्रजासत्ताक दिनी, ध्वजारोहण करताना केलेले विवेचन- १)पाशवी शक्तीचा लेश न अंतरी घुसो, प्रेमाने समता ममता विलसो- दिसो., २)देश हा देव ची पवित्र, कायदा हा त्याचे व्यवस्था सूत्र., ३)सेवाहीनांची पंचायत, ती गावास करील पंचाईत. , ४)लोकशाही म्हणजे लोकांचे मनोगत, सिंहासनी चढावे., लोकशाही म्हणजे लोकांचे हित, लोकांकडून व्हावे हातोहात., सर्व मालक म्हणोनी सत्य जबाबदारी ओळखावी., ५) लोकशाहीत जो सत्ताधारी, तो मालक नव्हेची निर्धारी., लोकशाहीचा कारभारी जबाबदारीही त्याची व राष्ट्रसंततुकडोजी.

लोकशाहीत सुद्धा असलेल्या हुकुमशाहीत व दडपशाहीत या लुटारूंच्या विरोधात आवाज काढण्याची हिम्मत मात्र शेतकरी करू शकला नाही. अन्नदात्याची मुस्कटदाबी सुरू झाली.आणि आवाज केलाच तर तो सत्ताधीशांनी वरूनच फूट पाडून , किंवा चोरांच्या ग्यागीत सत्तेत सामील करून त्याला दाबण्याचा प्रयत्न केला व त्याने इतरांचे राहिले,सुईले वाटोळे केले. या लुटारूच्या गळ्यात – शेतकरी, ज्या दिवशी खेटराचे हार टाक तील,तेव्हाच हा देश शेतकऱ्यांच्या बाजूने झुकल्या शिवाय राहणार नाही ?

नेत्यांच्या गळ्यात फुलांचे हार टाकूनच, शेतकऱ्यांनी आपल्या पायावर धोंडे पाडून घेतले.आता या सर्व व्यवस्थेला आमदार-खासदार जबाबदार आहेत? यांनी शेतकरी हिताचे कोणतेही कायदे संसदेत पुन्हा दुरुस्त केले नाहीत. कारण कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्यांना कायदे बदलण्याची गरजच वाटली नाही. सत्तेचा मलिदा टिकवण्यासाठी, वाढवण्यासाठीच सत्ताधीशांनी असा पाया मजबूत केला . हा चुकीचा पायंडा दुरुस्त करण्याची व उखडून फेकण्याची जबाबदारीच जनतेवर येऊन ठेपली.

**जय हिंद. जय बळीराजा.**



**धनंजय पाटील काकडे**
**-९८९०३६८०५८**
**तालुका-चांदूरबाजार,**
**जिल्हा-अमरावती**



# दिवाळीनिमित्त बंद असलेल्या घरावर चोरट्याने मारला डल्ला, सव्वा लाखाचे दागिने चोरीस

**भिवंडी/अभिजित हिरे**

दिवाळी निमित्त अनेक कुटुंब आपल्या गावी जात असताना अशा बंद घरांची रेकी करून चोरटे आपला हेतु साध्य करून चोरी करीत असल्याचा घटना घडत असताना भिवंडी तालुक्यात सुध्दा अशाच पद्धतीने घरफोडी करीत चोरट्याने सव्वा लाखांचे दागिने चोरी केले आहेत.

भिवंडी तालुक्यातील कशेळी टोल नाका येथील काव्य सृष्टी या इमारती मध्ये राहणाऱ्या प्राजक्ता सुभाष पाटील या महिला कुटुंबियांसह दिवाळी सणासाठी फ्लॅट बंद करून गावी अलिबाग येथे २४ ऑक्टोबर रोजी गेल्या होत्या. दरम्यानच्या काळात आलेल्या चोरट्याने घराचे मुख्य दरवाजाचे कडी कोयडा उखडून फ्लॅट मध्ये शिरलेल्या चोरट्याने घरातील कपाटात असलेले सोन्याचे १लाख ३४ हजार ९०२ रुपये किमतीचे दागिने चोरी करून पसार झाला.

या प्रकरणी महिलेने नारपोली पोलिसां कडे तक्रार दिली असून पोलिसांनी या गुन्ह्याची नोंद करीत घटनास्थळी सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर खैरनार व वरिष्ठ पोलीस निरीक्षक मदन बल्लाळ यांनी भेट देऊन या गुन्ह्याचा जलद गतीने तपास करण्याकरिता एक विशेष पथक तयार करून चोरट्याचा शोध घेण्याच्या सुचना पोलीस पथकांना दिली आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

31 TO 01 OCTOBER 2022 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 10/29/2022 9:47 PM Page 1



पान १ वरून....

## खोट्या सहानुभूतीला अनामिका फसली...

कलीयुगात गगनाला भिडला आहे. हा महागाईचा भस्मासुर शक्य तेवढा काबुत ठेवण्यासाठी आजकाल पती-पत्नी दोघेही नोकरी अथवा व्यवसाय करण्यासाठी घराबाहेर पडतात. दोघांच्या अर्थार्जनामुळे आर्थिक अडचणींची तिव्रता कमी होण्यास मदत होते. मात्र नोकरीनिमीत्ताने महिलांच्या घराबाहेर पडण्यामुळे अनेक पती पत्नीत कमी अधिक प्रमाणात वाद होण्याचे प्रमाण देखील वाढल्याचे चित्र दिसून येते.जळगाव शहरातील अनामिका (नाव बदललेले) ही एक खासगी नोकरदार विवाहिता होती. अनामिका आणि तिचा पती दोघेही नोकरी निमीत्त सकाळीच घरातून बाहेर जात होते. अनामिका नोकरी करत असलेल्या संस्थेत एक परप्रांतीय तरुण कामाला होता. राजेशकुमार जयनारायण पासवान असे त्या परप्रांतीय तरुणाचे नाव होते. राजेशकुमार हा बिहार राज्याच्या मुळ रहिवासी होता. अनामिका आणि राजेशकुमार दोघे एकाच ठिकाणी कामाला असल्यामुळे दोघांत चांगली मैत्री झाली होती. दोघे एकमेकांना आपल्या कथा आणि व्यथा शेअर करत होते. दरम्यान अनामिका आणि तिच्या पतीचे घरगुती कारणातून वाद होण्यास सुरुवात झाली होती. पती पत्नीमधील वाद अनामिका नोकरीच्या ठिकाणी राजेशकुमार यास कथन करत होती. तिची व्यथा ऐकून तो तिला धीर देत असे. वास्तविक पती पत्नीमधील वाद बाहेर कुणाकडे सांगायचा नसतो. मात्र अनामिकाला पतीपेक्षा तिचा नोकरीच्या ठिकाणी असलेला मित्र राजेशकुमार जवळचा वाटत होता. त्यामुळे ती त्याला सर्व गोष्टी कथन करत असे. जळगाव तालुक्यातील भडगाव येथील माहेर असलेली अनामिका लग्नानंतर पतीसोबत संसार करण्यासाठी औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव येथे राहण्यास आली होती. मात्र नंतर पतीच्या नोकरीनिमीत्त तीने जळगाव एमआयडीसी परिसरात आपला संसार थाटला होता. अवघी २९ वर्ष वयाची अनामिका दिसायला देखणी होती. आठ वर्षाच्या मुलाची आई असलेल्या अनामिकाचे तिशीला टेकलेले तारुण्य लाजवाब होते. तिच्या तारुण्याकडे बघून राजेशकुमार मंत्रमुग्ध होत असे. घरी पतीसोबत वाद झाल्यानंतर नोकरीच्या ठिकाणी समोर राजेशकुमार दिसताच अनामिकाचा मुड ऑन होत असे. तिच्या चेह-यावर प्रसन्नता येत असे. तिने आपला मोबाईल क्रमांक राजेशकुमारला दिला होता. राजेशकुमारने देखील त्याचा मोबाईल क्रमांक तिला दिला होता. तुला कधीही काही मदत लागल्यास मला फोन करत जा असे त्याने तिला म्हटले होते. गेल्या सप्टेबर महिन्यात अनामिकाचा तिच्या पतीसोबत घरगुती कारणावरुन वाद झाला होता. तु हे घर सोडून माहेरी निघून जा असे तिचा पती तिला रागाने म्हणाला. पतीच्या बोलण्याचा राग आल्यामुळे संतापाच्या भरात अनामिका पतीचे घर सोडून निघून गेली. त्याच कालावधीत राजेशकुमार नोकरी सोडून भोपाळ येथे दुसरी नोकरी करण्यास निघून गेला होता. पतीसोबत जोरदार वाद झाल्यामुळे संतापाच्या भरात घर सोडून निघालेल्या अनामिकाने राजेशकुमारसोबत संपर्क साधला. माझा पतीसोबत जोरदार वाद झाला असून मी घर सोडून कुठेही निघून जात असल्याचे तीने राजेशकुमारला सांगितले. आता मी नोकरी सोडून दिली असून भोपाळ येथे असल्याचे त्याने तिला फोनवर सांगितले. तु कुठेही जावू नको. तु माझ्याकडे भोपाळला ये असे त्याने तिला धीर देत सांगितले. सायंकाळी सात वाजता भोपाळला येण्यासाठी रेल्वे आहे. त्या रेल्वेने भोपाळला येण्यास त्याने तिला सांगितले. तु मला फसवणार तर नाही ना? असे तिने त्याला विचारले. तु माझ्यावर भरोसा ठेव, मी तुला फसवणार नाही. तु निर्धास्तपणे भोपाळला रेल्वेने ये असे तो तिला म्हणाला. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवत ती त्याला भेटण्यासाठी रेल्वेने निघाली. रेल्वे प्रवासदरम्यान दोघे एकमेकांसोबत मोबाईलच्या माध्यमातून संपर्कात होते. भोपाळला पोहोचल्यानंतर राजेशकुमारने सांगितलेल्या गावाला ती बसने पोहोचली. त्याठिकाणी राजेशकुमार तिचे स्वागत करण्यासाठी सज्ज होता. तो काम करत असलेल्या कंपनीतील एका खोलीवर तो तिला घेवून आला. प्रवासात थकवा आला असेल असे म्हणत त्याने तिला आराम करण्यास सांगितले. काहीवेळाने तो तिला खाण्यासाठी पदार्थ घेवून आला. प्रवासा दरम्यान ती थकली असल्यामुळे तिला लवकरच झोप लागून गेली. तरी देखील काहीवेळाने त्याने तिला शरीरसंबंध ठेवायचे का अशी विचारणा केली. तिने नकार दिला तरी देखील त्याने तिच्यासोबत बळजबरी शरीरसंबंध प्रस्थापित केले. राजेशकुमारने एका महिलेला कंपनीच्या रुममधे ठेवले असून त्याचे वर्तन योग्य नसल्याचे त्याच्या मालकाच्या लक्षात आले. त्याला नोकरीवर ठेवलेल्या मालकाने त्याला स्पष्ट सांगून टाकले की तु या महिलेला याठिकाणी ठेवू शकत नाही. त्यामुळे दोघे पती पत्नी असल्याचे भासवत राजेशकुमार तिला त्याच्या मित्राच्या रुमवर घेवून आला. पहिल्या दिवशी दोघे स्वतंत्र झोपले मात्र दुस-या रात्री तिला नाईलाजाने राजेशकुमार सोबत झोपावे लागले. तिची इच्छा नसतांना त्याने तिच्यासोबत शरीरसंबंध प्रस्थापित केले. तिच्यासोबत केलेल्या शरीरसंबंधाची त्याने व्हिडीओ शुटींग देखील केली. दरम्यानच्या कालावधीत अनामिका हरवल्याबाबत जळगाव एमआयडीसी पोलिस स्टेशनला मिसींग दाखल करण्यात आली. पोलिस तिचा शोध घेत होते. याबाबतची कुणकुण राजेशकुमारला लागली. त्याने हा प्रकार तिला सांगितला. त्यामुळे तीने जळगावला परत जाण्याची तयारी दर्शवली. राजेशकुमारचा तिला भोगण्याचा कार्यभाग साध्य झाला होता. त्यामुळे त्याने फारसे आढेवेढे घेतले नाही. तो तिला सोडण्यासाठी भोपाळ रेल्वे स्टेशनवर आला. तुझ्यासोबत जे काही झाले ते कुणाला सांगू नको असे तो तिला म्हणाला. तु माझ्यासोबत जे काही केले ते योग्य नव्हते असे ती त्याला म्हणाली. त्यावर निर्लज्जपणे तो तिला म्हणाला की तेवढ्यासाठीच तर मी तुला बोलावले होते. तुझ्यावर भरोसा ठेवून मी इथपर्यंत आली आणि तु मला फसवले असे ती त्याला म्हणाली. दोघांचे संभाषण सुरु असतांना जळगावला जाणारी रेल्वे आली. त्याने तिला रेल्वेत बसवून दिले. गाडी सुटल्यानंतर दोघे एकमेकांपासून वेगळे झाले. भोपाळ ते जळगाव रेल्वे प्रवास पुर्ण केल्यानंतर अनामिका जळगाव रेल्वे स्टेशनला उतरली. त्याठिकाणी तिला घेण्यासाठी तिचे मावसा आले होते. ते तिला एरंडोल येथे त्यांच्या घरी घेवून गेले. काही दिवस त्यांच्याकडे मुक्काम केल्यानंतर ती भडगाव येथे आई वडीलांकडे गेली. काही दिवसांनी तिला राजेशकुमारचा फोन आला. माझ्या फेसबुक अकाऊंटवर आपले फोटो कुणीतरी टाकले असल्याचे त्याने तिला सांगितले. ते फोटो नाहिसे करण्यासाठी तुला भोपाळला न्यायालयात येवून सही करावी लागेल अशी बतावणी त्याने तिला केली. आपण दोघे पती पत्नी आहोत असे वकिलांना सांगावे लागेल असे सांगून त्याने तिच्या मनात भिती घालण्यास सुरुवात केली. तिला भोपाळला बोलावून पुन्हा तिच्यासोबत शरीरसंबंध प्रस्थापित करण्याची त्याची इच्छा होती. त्याचा डाव तिच्या लक्षात आला. त्यामुळे तिने पुन्हा भोपाळला जाण्यास नकार दिला. तिचा नकार ऐकताच त्याने तिला धमकी दिली की तुझ्यासोबत शरीरसंबंध केल्याचा व्हिडीओ तुझ्या पतीसह भावाच्या मोबाईलवर मी पाठवतो. त्यात तुझी बदनामी होईल. त्याचा त्रास असह्य झाल्यामुळे तिने सर्व खराखरा प्रकार आईवडीलांसह पतीच्या कानावर टाकला. तिच्या आईवडीलांसह पतीने तिला धीर देत राजेशकुमार विरुद्ध पोलिसात तक्रार देण्यास सांगितले. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार याप्रकरणी तीच्या माहेरी असलेल्या भडगाव पोलिस स्टेशनला राजेशकुमार विरुद्ध विविध कलमानुसार शुन्य क्रमांकाने गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर हा गुन्हा जळगाव एमआयडीसी पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. ७३०/२२ भा.द.वि. ३७६ नुसार वर्ग करण्यात आला. गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे राजेशकुमार यास एमआयडीसी पोलिस पथकाने भुसावळ रेल्वे स्टेशन परिसरातून ताब्यात घेत अटक केली. पोलिस उप निरीक्षक दीपक जगदाळे, पोलिस नाईक दत्तात्रय बडगुजर, पो. ना. विकास सातदिवे, पो.कॉ. छगन तायडे, महिला पोलिस नाईक मिनाक्षी घेटे व चालक हे.कॉ. खान आदींनी या कारवाईत सहभाग घेतला. पुढील तपास पोलिस उप निरीक्षक दिपक जगदाळे व पोलिस नाईक दत्तात्रय बडगुजर करत आहेत.

## गुप्तधनाची आस दाखवून खिसा रिकामी...

पध्तशीरपणे गेम करीत असतात.तासगाव तालुक्यातील धामणी येथील अवधूत शिंदे याचा मृतदेह ८ डिसेंबर २०२१ रोजी नागज घाटात पोलीसांना छिन्नविच्छन अवस्थेत मिळून आला होता.त्याच्या मानेवर डोक्यावर कुठल्यातरी जाड हत्याराने वार केल्याचे दिसून येत होते.त्याच्या बाजुलाच एक बुलेट पडलेली होती,जेणेकरून त्याचा अपघात झाल्याचे सकृत दर्शनी वाटावे अशी परिस्थीती मारेकऱ्यांनी केली होती.पोलीस या घटनेचा तपास करीत असताना तब्बल चार महिन्यांनी या घटनेचा उलघडा करण्यात पोलीसांना यश आले.अवधूत शिंदे याची हत्या गुप्तधन शोधून देण्याच्या कारणातून चौघांनी केली होती.पोलीसांनी त्याना ताब्यात घेतले होते.या घटनेचा तासगाव पोलीसातून मिळालेली माहिती अशी तासगाव तालुक्यातील धामणी येथे अवधूत शिंदे हा आपल्या कुंटूंबासह राहयला आहे.त्याच्या घरची परिस्थिती तशी सधन असून तो देवदेवर्षी करीत होता.आपल्याकडे येणाऱ्याना तो आपल्या परीने त्याच्या अडचणीतून मार्ग सांगत होता.पाडळी येथील आनंदराव पाटील हा त्याचे परिचयाचा होता.तो त्याचेकडे नेहमी येत जात असल्याने अवधूत शिंदे हा अनेकांना त्याचे अडचणीतून मार्ग सांगत असतो तसे तो आपल्याला ही आपल्या अडचणीतून मार्ग सांगेल असे आनंदराव पाटील याना वाटत होते.त्याच्या घरची परिस्थीती ही सधन असली तरी अलिकडच्या काही एक दोन वर्षात ते आपल्या आर्थिक परिस्थिीने बेजार झाले होते.त्यामुळे त्याना पैशाची फार अडचण होती.तसे तर कितीही आर्थिक पस्थिीती सधन असली तरी प्रत्येकाला या ना त्या कारणातून पैसे ही लागतच असतात.त्यामुळे तो पैसा कसा ही आणि कुठून ही मिळाला तरी तो चालत असतो ही दुनियादारीच सगळी पैशाच्या मागे धावत असल्याने पैसा कसा ही मिळवायचा हा ज्याचा त्याचा प्रश्न असल्याने कुणाला आयतेच पैसे पाहिजे असल्याने ते अशा देवदवर्षी करणाऱ्याच्या मागे धावत असतात.आनंदराव पाटील हे त्यातीलच एक होते. अवधूत हा त्याचा मित्र असल्याने त्याने आपल्या अडचणीतून मार्ग काढणेसाठी त्याला विचारले असता अवधुत याने त्याला त्याचा हात पाहून तुला तर फार मोठे घबाड मिळण्याची शक्यता आहे.तुझ्या हातात गुप्तधनाची रेषा आहे.तुला गुप्तधन मिळू शकते असे सांगितल्यावर आनंदराव पाटील याना गुप्त धनाची लालसा झाली.ते गुप्तधन मिळविणेसाठी काय करावे लागेल आणि ते कोठे मिळेल असे विचारल्यावर अवधूत याने ते गुप्त धन तुला तुझ्या घरच्या भिंतीत सापडेल त्यासाठी फार काही प्रयत्न करावे लागणार नाहीत मी तुला ते गुप्तधन मिळवून देतो पण यासाठी काही रक्कम मला अगोदर दयावी लागेल त्यानंतरच मी तुला ते गुप्तधन मिळवून देईन असे सांगितले. गुप्तधन मिळविणेसाठी आनंदरावची काही ही करण्याची तयारी होती.म्हणून त्यांनी त्याला तो मागेल तेवढी रक्कम देण्याचे ठरविले होते.आपल्या प्रमाणे आपल्या मित्रांना ही त्यांनी गुप्तधनाची लालसा दाखविली.त्यांनी अवधूत शिंदे याचे कडे नेवून त्याना ही गुप्त धन मिळवून देण्याची विनंती केली.आनंदराव यांनी आपले मित्र घोटी खुर्द येथील तुषार बाळू कुंभार,आणि सातारा तालुक्यातील आबंवडे येथील अमोल विठ्ठल कारंडे यांना ही अवधूत शिंदे यांची भेट घालून दिली.अवधुत शिंदे हे गुप्तधन शोधून आणि ते मिळवून देण्यात माहीर आहेत काही थोडक्या रक्कमेत ते आपल्याला गुप्तधन शोधून देतात असे सांगून या दोघांनाही त्यांनी अवधूत शिंदे याना पैसे देण्यास भाग पाडले.त्या तिघांना ही त्यांनी ऑगस्ट २०२१ च्या मध्यात लाखाच्या घरात रक्कम दिली होती.आपल्याला गुप्तधन मिळाले की आपण श्रीमंत होवू आपण मस्तपैकी आपले आयुष्य जगू असे त्यांनी स्वप्न रंगावयला सुरूवात केली.आनंदराव पाटील हे साठीच्या आसपासचे होते.तर तुषार कुंभार आणि अमोल कारंडे हे तीसीच्या जवळपासचे होते.या तिघांना ही गुप्तधनाची आशा होती.म्हणून तर ते तिघे ही अवधूत शिंदे याच्या गळाला लागलेले होते.अवधूतला ते तिघे ही गुप्तधन दाखवा आणि ते मिळवून दया म्हणून पाठ लागलेले होते.अवधूतने त्याचेकडून पैसे घेतले असल्याने तो त्याना तुमचे काम करतो पण जरा सुबरीने घ्या कारण गुप्तधन मिळवायचे तर त्यासाठी काही विधी कराव्या लागतात त्या पुर्ण झाल्या की मी तुम्हाला गुप्त धनाची जागा दाखवितो तेथे तुम्ही खोदकाम करा आणि गुप्त धन घ्या असे सांगितले.त्यावर ते तिघे ही गप्प बसले होते. प्रत्येकवेळी अवधूत हा त्याना आमवश्या प्रौर्णिमा याचे कारण देत त्याना तुमच्यासाठी विधी करतोय त्यात मला ते दिसले की मी तुम्हाला त्या गुप्तधनाची जागा दाखवितो असे सांगत टोलवत होता.ते ही त्याचे प्रत्येकवेळी ऐकून घेवून गप्प बसत होते.अशातच दोन चार महिने निझून गेले तरी ही अवधूत शिंदे हा त्याना काही गुप्तधन मिळवून देईना तशी जागा ही त्याना दाखवेना त्यामुळे आनंदराव पाटील याना त्याची शंका येवू लागली.ते अलिकडे त्याला मला गुप्त धन मिळवून तरी दे नाही तर आम्ही दिलेले पैसे तरी परत दे म्हणून मागे लागलेले होते.पण,अवधूत शिंदे हा त्याना चांगलाच भारी पडलेला होता.तो त्याना गुप्तधन ही मिळवून देत नव्हता.किंवा त्याने त्याचेकडून घेतलेले पैसे ही परत करत नव्हता.त्यामुळे आनंदराव पाटील तुषार कुंभार,आणि अमोल कारंडे हे त्याचेवर चिडून होते.हा आपल्याला सारखा उल्लू बनवित आहे याला काही तरी धडा शिकवालाच पाहिजे म्हणून त्यानी विचार केला.सरळ मार्गाने जर अवधूत शिंदे याने घेतलेले पैसे परत दिले नाहीत तर त्याला चांगलीच अद्दल घडवायची यासाठी त्यानी आपल्या कटात वैभव सकट,लखन ठोंबरे आणि अण्णा नावाच्या एका व्यक्तीला सामावून घेतले. त्यांनी गोड बोलून अवधत शिंदे याला ७ डिसेंबर २०२१ रोजी संध्याकाळी नागज घाटात कामानिमित्य बोलावून घेतले. कवठेमहंकाळ तालुक्यातील नागज घाटातील काही भाग हा फॉरेस्ट विभागात येत असल्याने तो भाग तसा निर्मनुष्य आहे.या भागात रात्रीच्यावेळी वर्दळ तशी कमीच असते.आनंदराव पाटील यांनी तेथे बोलावल्यावर अवधूत शिंदे हा तेथे आपल्या बुलेट गाडीवरून गेला होता.तेथे पोहचल्यावर अवधूत बरोबर आनंदराव पाटील हे त्याला गुप्तधनाबाबत विचारू लागले त्यात त्या दोघांची तेथे वादावादी सुरू झाली.भरीत भर म्हणून त्या ठिकाणी असणारे पाटील याचे मित्र तुषार कुंभार,अमोल कारंडे, वैभव सकट लखन ठोबरे यांनी त्याला दमबाजी देत त्याचे अंगावर जात तु आमचे पैसे दिला नाहीस तर तुला आता ठेवतच नाही म्हणून मारहाण करू लागले तसे तर अवधूत याला धडा शिकवायचाच या तयारीनेच ते सर्वजण तेथे आले होते.त्यांनी अवधुत याला गाडीवरून खाली पाडून लाथाबुक्क्यांनी तुडवायला सुरूवात केली त्याचवेळी तुषार कुंभार आणि अमाले कारंडे यांनी त्याचेडोक्यावर आपल्याकडील लोंखडी रॉडने जोरात प्रहार केला.त्याचे डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला.अवधूत हा ओरडतच खाली पडला.मर साल्या म्हणत त्यांनी परत त्याचेवर वार केला.त्यासरशी तो उठलाच नाही.त्याचा जागीच मृत्यू झाला.या कामात यांना वैभव सकट,लखन ठोंबर,आणि आण्णा यांनी देखील मदत केली.आपल्या हातून अवधूत शिंदे याचा खून झाल्याचे त्याचे लक्षात आल्यावर ते सर्वजण घाबरले.त्यांनी त्याचा मृतदेह त्या निर्जन ठिकाणावरून ओढून आणून घाटातील रस्त्याकडेला टाकला. त्याच्या बाजुलाच त्यांनी त्याची बुलेट गाडी लावली.जेणेकरून त्यांनी त्याचा अपघातात मृत्यू झाल्याचे भासविले.आणि तेथून त्यांनी पोबारा केला.दुसऱ्या दिवशी सकाळी त्या मार्गवरून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना रस्त्याकडेला एका तरूणाचा मृतदेह पडला असल्याचे दिसल्यावर त्यांनी त्या घटनेची माहिती तासगाव पोलीसाना दिली.पोलीसांनी घटनास्थळी दाखल होवून घटनेची पाहणी केली असता त्याना ही तो अपघात झाल्याचेच वाटत होते.पोलीसांनी मयताची ओळख पटवून तपासाला सुरूवात केली. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी कवठेमंहाकाळ रुग्णालयात पाठवून दिला. शवविच्छेदन रिपोर्टमध्ये मयताच्या जड हत्याराने वार केल्याने मृत्यू अशी नोंद केलेली होती.यावरून पोलीसांनी मयत अवधूत शिंदे याचा कुणी तरी अज्ञात कारणातून खून केल्याची शक्यता वर्तवून पुढील तपासाला सुरूवात केली. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना मयत अवधूत शिंदे हा देवदवर्षी करीत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती.म्हणून पोलीसांनी त्याचे सर्पकात कोण कोण येत होते याची माहिती काढली.या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे अन्वषणचे पोलीसही करत होते.घटना घडून दोन तीन महिने होत आले तरी या घटनेतील मारेकरी पोलीसाना सापडत नव्हते.त्याच्या मार्गावर पोलीसाची दोन पथके होती. वेगवेगळया ठिकाणी पोलीस त्याचा शोध घेत होते.या कामासाठी पोलीसांनी आपल्या गुप्त खबऱ्याना ही कामाला लावले होते.अखेर तीन महिन्यांनी गुप्त खबऱ्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी अवधूत शिंदे याच्या खूनात आनंदराव पाटील याचा हात असल्याची माहिती मिळाली. आनंदराव पाटील यांना मयत अवधूत शिंदे याने गुप्त धन मिळवून देण्याचे अमिष दाखविले होते.त्याबद्दल्यात त्यांनी त्याला मोठी रक्कम ही दिली होती.या अनुषंगाने पोलीसांनी आनंदराव पाटील याना ताब्यात घेवून त्याचेकडे या घटनेची चौकशी करीत असताना त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.या घटनेत त्याचे साथीदार तुषार कुंभार,अमोल कारंडे हे देखील सहभागी असल्याची माहिती मिळाल्यावर पोलीसांनी त्यांना ही ताब्यात घेतले होते.त्याचेकडे ही चौकशी केली असता त्यांनी अवधुत शिंदे याच्या खूनाची कबुली दिली.या घटनेतील वैभव सकट,लखन ठोंबरे आणि आण्णा नावाची व्यक्ती फरार होती.पोलीस त्याचा शोध घेत होते.मयत अवधूत शिंदे याच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी अवधूत सोपन शिंदे रा.धामणी तासगाव याच्या खूनप्रकरणी आनंदराव पाटील (वय५७) रा. पाडळी तुषार कुंभार(वय २७)रा.घोटी खुर्द तासगाव आणि अमोल कारंड(वय२२) रा.आंबेवाडी,सातारा आणि वैभव सकट,लखन ठोंबर,आण्णा याच्या विरोधात,भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून यातील आनंदराव पाटील,तुषार कुंभार,आणि अमोल कारंडे याना मा.कोटासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान त्याचेकडून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल,लोखंडी रॉड जप्त केले.उर्वरीत तीन जणांचा पोलीस शोध घेत होते.या घटनेचा पुढील तपास तासगाव पोलीस करीत आहेत.पैशाच्या लालसेने आपली फसगत होते हे माहित असून देखील काही लोक गुप्तधनाच्या मागे लागत असतात त्यातूनच अशा घटना घडतात हेच या घटनेवरून दिसून येते.अखेर तीन महिन्यांनी ही घटना उघडकीस आणून पोलीसांनी आम्ही गाढलेले मुडदे देखील उकरून काढून गुन्ह्याचा शोध लावतो हेच दाखवून दिले.

## सैनिकाच्या पत्नीचे दुसऱ्याशी जुळून...

पाहत नाही. अशा प्रकारच्या घटनेतून चरखी दादरी येथील किशनपुरा येथे मोनिका नावाच्या महिलेने नवरा प्रवीण कुमार याच्या जेवणात झोपेच्या गोळ्या घातल्या नंतर त्याचा प्रियकराच्या मदतीने गळा आवळून खून केला. नंतर दुसऱ्या दिवशी तिने नवऱ्याचा झोपत हार्ट अॅटकने मृत्यू झाल्याचा बनाव रचला.विशेष म्हणजे प्रवीण कुमार हा सैन्यात नोकरीस होता.तो दुश्मनाच्या गोळीला कधी घाबरला नाही.पण स्वत:च्या पत्नीने त्याचा विश्वासघात करून त्याचा प्रियकराच्या मदतीने खून केला.५ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रवीण कुमार याचा संशयास्पद स्थितीत मृतदेह पोलीसाना आढळून आला होता.शवविच्छेदन रिपोर्टनंतर या खूनाचा उलघडा करण्यात पोलीसाना यश आले.या घटनेचा दादरीच्या पोलीस स्टेशनमधून मिळालेली माहिती अशी हरियाणातील चरखी येथील प्रवीणकुमारचा विवाह मोनिकाबरोबर समाजाच्या रितीरिवाजानुसार गेल्या पाच वर्षापूर्वी झाला होता.मोनिका ही दिसायला देखणी आणि सुंदर असल्याने चार चौघात उठून दिसत होती.लग्नानंतर दोन तीन वर्ष त्याचा संसार सुखा समाधानाने चालला होता.प्रविण ही लग्नाअगोदरपासून मिलट्रीत असल्याने त्याने आपले जीवन देशसेवेला अपर्ण केले होते.वर्षातून एकदा दोनदा तो सुट्टी घेऊन गावाकडे येत होता.त्यावेळी तो आठ पंधरा दिवस राहत असल्याने त्यावेळेसच मोनिकाला त्याचा सहवास लाभत होता.आपल्याला नवऱ्याचा सहवास जास्त दिवस मिळत नसल्याने मोनिका ही कायम उदास राहत होती.ती उदासी तिच्या चेहऱ्यावर दिसत होती.तशी ती कामूक असल्याने तिची नजर त्यासाठी भिरभिरीत होती. प्रवीण कुमारच्या घराच्या लोकांना आपला मुलगा देशसेवेसाठी काम करीत असल्याचे बघून समाधान वाटत होते.तर मोनिका मात्र नवऱ्याच्या आठवणीने कायम व्याकुळ आणि उदास राहत होती.नेमकी तिची ही उदासी गावातील विकी नावाच्या युवकाने हेरली होती.तो तिच्या मागे मागे कायम असयाचा तिला वहिनी वहिनी म्हणत लाडी गोडी लावीत बोलत होता.तिच्याशी जवळीक साधणेसाठी तो तिच्या सौदर्याची तारीफ करत होता.तिला ही तेच हवे असल्याने तिचा पाय घसरायला वेळ लागला नाही.जवानीची आग ही काय असते ते तिने अनुभवले होते.ऐन जवानीत तिची जीवाची काहिली होत होती.कुणी तरी यावे आणि आपली जवानी कुस्करून काढावी असे तिला वाटत होते.नवऱ्याच्या त्या सुखापासून वंचित असल्याने नवऱ्याची कसर भरून काढणारा मर्द गडी तिला हवा होता,आणि तो गडी तिला विकीच्या माध्यमातून मिळाला होता. विकीशी तिची जवळीकता वाढत चालली होती.त्यातून त्या दोघांना जवळ यायला वेळ लागला नाही. घरी कुणी नसताना ती त्याला आपल्या घरातील बेडवर बोलावू लागली. तिच्या मनातील त्याने ओळखले असल्याने तो ही तिच्याशी वहिनी वहिनी करत गप्पा मारत बसत होता.सुरवातीला मोनिकाच्या सासू सासऱ्याना या विषयी काही वाटले नाही कारण मोनिका तशी वागणार नाही याची खात्री त्याना होती.त्यामुळे त्यांनी ही तिच्याकडे दुर्लक्ष केले होते.ते शेतात कामाला गेले की ती विकीला घराकडे बोलावित होती.तो घराकडे आला की तिच्या घराचा दरवाजा बंद होत होता.या बंद दरवाजा आड त्या दोघाचे नेमके काय चालते हे शेजाऱ्यांनी ओळखले होते.त्यामुळे त्या दोघांच्या विवाहबाय संबंधाची चर्चा ही होवू लागली.ही चर्चा तिच्या सासू सासऱ्याच्या कानावर आल्यावर त्यांनी ही त्याची खात्री करून घेवून याचा जाब मोनिकाला विचारला असता ती त्याना ताकास तूर लागू न देता तुम्ही मला बदनाम करीत आहात.माझा नवरा जवळ नाही म्हणून तुम्ही माझ्यावर आळ घेत आहात असा उलटा आरोप केला.त्यानंतर काही दिवस गेल्यावर प्रकरण शांत झाल्यासारखे वाटत असताना एकदा मोनिका ही सासु सासऱ्याना रंगेहात सापडली.तिच्या सासू सासऱ्यांनी तिला विकी बरोबर नको त्या अवस्थेत पाहिले होते.त्यावेळी त्यांनी या घटनेची माहिती सैन्यात असणाऱ्या आपला मुलगा प्रवीणकुमार याला दिली होती.त्याने त्यावेळी या घटनेचा जाब फोनवरून मोनिकाला विचारल्यावर तिने तुमचे आई बाबा कोणाला काहीही माझ्या विषयी सांगून माझे चारित्र्यावर शिंतोंडे उडवित आहेत मला बदनामा करीत आहेत असे प्रवीण याला सांगून गप्प बसविले होते.त्यानंतर महिन्या दोन महिन्यांनी तो गावाकडे आल्यावर त्याला शेजाऱ्याकडून आणि घरच्या लोकाकडून मोनिकाच्या वागण्या विषयी समजले होते.त्यावेळी त्याने मोनिकाच्या आई वडिलांना बोलावून घेवून मोनिकाच्या वागण्याबद्दल सांगून तिला समज दयायला लावले होते.या कारणातून मोनिका ही आपल्या सासू ससाऱ्यावर चिडली होती.त्यांनीच तिला बदनाम केले असा तिचा आरोप होता.नवऱ्याचे सुख मिळत नसल्याने अगोदरच ती नाराज होती.त्यातच सासु सासऱ्यांनी तिचे लफडे बाहेर काढल्यावर ती जास्तच पिसाळली होती.प्रवीण परत सुट्टी संपवून सैन्यात गेल्यावर ती सासू सासऱ्याना दम देवून मी माझ्या मनाप्रमाणे वागणार तुम्ही मला कोण विचारणा म्हणत मी आता विकीला तुमच्या समोरचा घेवून झोपणार आहे तुम्हाला काय करायचे ते करा असे म्हणत भांडत काढीत होती.ही भांडणे फारच विकोपला गेली होती.प्रवीण ही तिला समजावून थकला होता.पत्नीच्या अशा बदफैली वागण्याने त्याला गावाकडे ही यायला नको वाटत होते.पण सुट्टी म्हणून तो वर्षातून सहा महिन्यातून एकदा गावाकडे येत होता.घरच्या भांडणाने तो वैतागलेला होता. मोनिका काही त्याचे सांगून ही ऐकत नव्हती.उलट तिला आपल्या त्या संबंधात नवरा प्रवीणचा अडथळा वाटत होता.त्या कामात नवऱ्यापेक्षा प्रियकर विकीच तिला भारी वाटत असल्याने ती त्यालाच आपल्या अंगावर ओढून घेत होती.गावाकडे प्रवीण आला की घरच्या भांडणाने दारूपिवूनच झोपत होता.मोनिका ही त्याला जवळ घेत नव्हती त्यामुळे त्याचे मानसिक संतुलन बिघडत चालले होते.गेल्या आठ पंधरा दिवसापूर्वी तो डयुटीवरून गावाकडे आला.त्यावेळी ही मोनिकाच्या वागण्यावरून घरात भांडणे लागलेली होती.तो पार वैतागलेला होता.त्यातच मोनिका त्याला तू माझा नवरा नाहीस माझा नवरा विकी आहे मी त्याच्याबरोबरच संसार करणार आहे तुम्हाला काय करायचे ते करा म्हणून भांडण काढू लागली होती.त्या भांडणात त्याने तिचा गळा आवळला होता.पण त्यावेळी घरच्या लोकांनी त्याला सोडवून घेतल्याने ती वाचली होती.नवरा ही आपल्यावर उलटा झालेला आहे हे बघून मोनिकाने आता त्याचीच गेम करायची असे ठरविले होते.आपल्या त्या संबंधात त्याचा तिला अडसर वाटू लागला होता. नवऱ्याला एकदा का आपल्या मार्गातून हटविले की आपल्याला विकीबरोबर मजा मारायला सोपे जाणार मग आपल्या सबंधाला कोणी विरोध करणार नाही. नवरा एकदा सुट्टी संपवून कामावर गेला की तिच्या हातून ती संधी जाणार होती.या कामासाठी तिने विकीला आपल्या पदरात बांधून घेतले होते.त्याला तिने तू आणि मी मिळून माझ्या नवऱ्याला मारून टाकूया असे सांगितले सुरूवातीला त्याने या कामासाठी नकार दिला.परंतू तिने त्याला आपल्या राणीची अशी काही झलक दाखविली होती की तो तिच्या राणीशिवाय राहू शकत नव्हता म्हणून तो ही प्रवीण याला संपवायला तयार झाला.त्याला संपवायचे तर सहजा सहजी काम नव्हते.तो सैन्यात असल्याने तो अंगा पिंडाने धष्टपुष्ट होता.मग मोनिकानेच एक चाल खेळली. कसे ही तो दारू पिवून झोपतो हे तिला व विकीला माहित होते.म्हणून तिने घटनेच्या दिवशी म्हणजे शुक्रवार दि.४ फेब्रुवारी २०२२ रात्री त्याच्या जेवणात झोपच्या आठ दहा गोळ्या मिसळ्या.जेवणा आधी नेहमी प्रमाणे प्रवीण याने दारू जास्त डोसली होती.त्यातच जेवणातील झोपच्या गोळ्यांनी असर दाखवायला सुरूवात केली.कसा बसा जेवण करून तो आपल्या रुममध्ये झोपयाला गेला.बेडवर पडल्या पडल्या त्याला शांत झोप लागली.तो घोरू लागल्यावर मध्यरात्रीच्या सुमारास मोनिकाने ठरल्याप्रमाणे विकीला फोन लावून बोलावून घेतले.तो येण्या आधी तिने हुशारीने दरवाजा उघडा ठेवला होता.प्रवीण हा घोरत आहे आणि तो बेशुध्द आहे हे तिने ओळखल्यावर आपण त्याचे हातपाय दाबून धरले.तर प्रियकर विकी याला त्याचा गळा आवळण्यास सांगितले.प्रवीणचा गळा आवळताना तो कमी पडू लागल्यावर तिने त्याचे हात पाय सोडून आपले ही दोन्ही हात नवऱ्याच्या गळ्याला लावले.ते दोघे ही त्याचा गळा आवळीत असताना प्रवीण याला शुध्द नव्हती.त्या दोघांच्या ताकदीपुढे तो काही वेळात निपचिप पडला. तो शांत झाल्यावर मोनिकाने प्रियकराला हळूच घराच्या बाहेर काढले. दुसऱ्या दिवशी सकाळी तिने झोपतून उठून आराडा ओरडा करायला सुरूवात केली.तिने नवऱ्याला सकाळी चक्कर येत असल्याने तो बेशुध्द पडल्याचे सांगितले.तिच्या सांगण्यावरून तिच्या घरच्या लोकांनी व शेजाऱ्यांनी प्रवीण याला दादरीच्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले.परंतू तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले.त्यामुळे मोनिकाने आपल्या नवऱ्याचा मृत्यू हा हार्ट अॅटकने झाल्याचे सगळीपडे पसरविले.पण हे सत्य ती फार काळ लपवू शकली नाही.कुणाला तरी शंका आल्याने या घटनेची माहिती पोलीसांना देण्यात आली. पोलीसांनी रितसर सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल होऊन डॉक्टराकडून या घटनेची माहिती घेवून प्रवीणचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला.तो पर्यत मिलट्री नियामाप्रमाणे शासकीय इंतामात प्रवीणच्या मृतदेहावर त्याच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले होते.पोलीसांना दुसऱ्या दिवशी पोस्ट मार्टम रिपोर्ट मिळाला होता.त्या रिपोर्टमध्ये गळा आवळ्याने श्वास गुदरमरून मृत्यू अशी नोंद होती.याचा अर्थ प्रवीणचा कुणी तरी गळा आवळला होता.त्यात त्याचा मृत्यू झाला होता हे पोलीसांनी ताडले होते.संशयावरून पोलीस मयत प्रवीणकुमार याची पत्नी मोनिका हिच्याकडे चौकशी करीत असताना तिच्या बोलण्यात पोलीसांना विसंगती जाणवत होती.म्हणून पोलीस तिच्याकडे खोदून खोदून चौकशी करीत असताना ती पोलीसाच्या प्रश्नासमोर हतबल झाली आणि तिने आपला गुन्हा कबुल करीत तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसाना दिली.नवरा आपल्या त्या संबंधात अडसर ठरत असल्याने प्रियकराच्या मदतीने त्याला जेवणात झोपेच्या गोळ्या घातल्या आणि नंतर आम्ही दोघांनी त्याचा गळा आवळ्याच्याचे तिने पोलीसाना सांगितले. तिने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी या घटनेतील दुसरा आरोपी विकी याला ताब्यात घेतले.त्याने ही आपला गुन्हा कबुल केला.मयत प्रवीणकुमार याच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरून पोलीसांनी प्रवीणकुमार (वय३३) याच्या खून प्रकरणी त्याची पत्नी मोनिका(वय२८)तिचा प्रियकर विकी(वय३०)याचे विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ नुसार गुन्हा नोंदवून त्या दोघांना कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.या घटनेचा पुढील तपास किशनपुरा पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत..विवाहबाहय संबंधात पत्नी पुढे गेली की ती नवऱ्यचा घात करते हेच या घटनेवरून दिसून येते.

